9011861035
श्रीराम बझार

• किराणा
• ड्रायफुड्स
• मसाले
• घरगुती वस्तु
• कॉस्मेटिक्स
सिद्धीविनायक मंदिर समोर, काळाराम मंदिर रोड, श्रीरामपूर

दैनिक
राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २६ । बुधवार ४ नोव्हेंबर २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

आदित्य रिन्यूएबल एनर्जी (सोलर प्रोजेक्ट)
पी.एम. सुर्यघर योजना
रू.७८,०००/-
अनुदान,
शासकिय बँकेचे
५.७५%
दराने कर्ज
तात्काळ जागेवरच
मंजूर
२००५ पासून ग्राहकसेवेत

प्रकाश घुगे : ९४२३७८५९६५ ऑफिस : ९८५०७१६४०६
श्रीरामपूर : नगरपालिका हॉस्पिटल समोर, श्रीरामपूर

महत्वाचे..

कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्न राबविण्यास शासन सकारात्मक

मुंबई : राज्यातील कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्न लागू करण्याबाबत शासन सकारात्मक असून, कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील शिफारशींनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली. भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींसोबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत कामगारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी कामगार विमा योजनेच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या प्रतिनिधींची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येईल, असेही फुंडकर यांनी सांगितले. घरेलू कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच नवीन कामगार कायद्यानुसार बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित योजनांच्या अंम लबजावणीबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. या बैठकीला भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव अनिल डुमणे आणि प्रदेशाध्यक्ष किरण मिलगिर उपस्थित होते.

जिल्हा बँकेवर विखे-थोरातांचे निर्विवाद वर्चस्व!

२१ पैकी १७ जागांवर सहकार विकास पॅनेलचा विजय



- राम शिंदे गटाचे दोन, खासदार लंके यांचीही दमदार एन्ट्री
- आता अध्यक्षपदासाठी रस्सीखेच..?

अहिल्यानगर : विशेष प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होताच जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील सत्तेचे चित्र स्पष्ट झाले आहे. राज्याच्या राजकारणात एकमेकांचे पारंपरिक विरोधक असलेले पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी सहकाराच्या निमित्ताने एकत्र येत जिल्हा बँकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. २१ पैकी १७ जागांवर विजय मिळवत सहकार विकास पॅनेलने एकहाती सत्तेचा मार्ग मोकळा केला. मात्र, या विजयात (पान ४ वर)

२१ जागांचे गटनिहाय बलाबल

गट	जागा
बाळासाहेब थोरात गट –	१२
राधाकृष्ण विखे पाटील गट –	५
प्रा. राम शिंदे गट –	२
खासदार नीलेश लंके –	१
संजीवनी शिंदे-गायकर (स्वतंत्र, नंतर पाठिंबा) –	१
	एकूण – २१

निवडणुकीत विजय मिळवलेले १० संचालक

अकोले – संजीवनी शिंदे-गायकर – ४९
कर्जत – ज्योती प्रकाश शिंदे – ५४
पारनेर – खासदार नीलेश लंके – ६४
राहुरी – आमदार प्राजक्त तनपुरे – ८९
शेतीपूरक संस्था – आमदार आशुतोष काळे – ७५०
महिला राखीव – अनुराधा नागवडे – २,६४१
महिला राखीव – संगीता वाघ – २,२९२
अनुसूचित जाती-जमाती – वैभव पिचड – २,६९०
ओबीसी – कारभारी जावळे – २,६७६
भटके-विमुक्त – गणपतराव सांगळे – २,४६१

दिग्गजांचा पराभव

अकोले – आमदार डॉ. किरण लहामटे (३६ मते)
कर्जत – तुषार अंबादास पिसाळ (२० मते)
पारनेर – राहुल शिंदे (४० मते)
राहुरी – सत्यजित कदम (१८ मते)
महिला राखीव – हर्षदा काकडे (१,४८९ मते)
अनुसूचित जाती-जमाती – तुषार लोखंडे (१,०८६ मते)

बिनविरोध निवडून आलेले ११ संचालक

जामखेड – सचिन घुमरे
अहिल्यानगर – आमदार अक्षय कर्डिले
कोपरगाव – बिपीन कोल्हे
नेवासा – शंकरराव गडाख
पाथर्डी – आमदार मोनिका राजळे
राहाता – डॉ. सुजय विखे पाटील
संगमनेर – रणजितसिंह देशमुख
शेवगाव – राजश्री घुले
श्रीरामपूर – करण ससाणे
श्रीगोंदा – दत्ता पानसरे
बिगरशेती संस्था – सचिन जगताप

जिरायतीला ११ हजार, फळबागाना ३० हजार...

बळीराजाला दिलासा! एनडीआरएफ मदतीचे दर वाढले

- मृताच्या कुटुंबाला आता ८ लाखांची मदत
- पशुधन आणि घरांच्या नुकसानीच्या भरपाईतही वाढ
- महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे वाढीव मदतीकडे लक्ष

दैनिक राष्ट्र सह्याद्री । विशेष वृत्त

मुंबई : नैसर्गिक आपत्तीच्या संकटात सापडलेल्या शेतकरी, पशुपालक आणि सर्वसाम ान्य नागरिकांसाठी केंद्र सरकारने दिलासादायक निर्णय घेतला आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या (एनडीआरएफ) माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या निकषांमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, जिरायती शेतीच्या नुकसानीपोटी मिळणारी मदत प्रति हेक्टर ८ हजार ५०० रुपयांवरून ११ हजार रुपये, तर फळबागांसाठीची मदत २२ हजार ५०० रुपयांवरून थेट ३० हजार रुपये करण्यात आली आहे. नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला मि ळणारी मदतही चार लाखांवरून आठ लाख रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे अतिवृष्टी, पूर आणि दुष्काळाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांसाठी सुधारित मदत निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार बागायती शेतीच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर १७ हजारांऐवजी २२ हजार रुपये मि ळणार आहेत. बहुवार्षिक पिके आणि फळबागांच्या नुकसानीसाठी ३० हजार रुपये मदतीची तरतूद करण्यात आली आहे. शेतीच्या नुकसानीसाठीच्या या वाढीमुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

नैसर्गिक आपत्तीत जनावरांचा मृत्यू झाल्यास मोठ्या जनावरांसाठी मिळणारी मदत ४० हजारांवरून ५० हजार रुपये, तर लहान जनावरांसाठी चार हजारांवरून ५ हजार १०० रुपये करण्यात आली आहे. ओझी वाहणाऱ्या प्राण्यांसाठी २५ हजार ४०० रुपये मिळतील. कुक्कुटपालनातील नुकसानभरपाईही प्रति कोंबडी १०० रुपयांवरून १३० रुपये करण्यात आली आहे.पूर्णतः पडझड झालेल्या घरांसाठीची मदत १ लाख २५ हजारांवरून १ लाख ६० हजार रुपये करण्यात आली आहे. दुर्गम भागातील घरांसाठी ही मदत १ लाख ७० हजार रुपये असेल. घर पडझडीसाठी मिळणारी तात्पुरती मदतही ५ हजारांवरून ८ हजार ५०० रुपये करण्यात आली आहे.राज्यातील दुष्काळग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. मात्र, सुधारित निकषांची राज्यातील अंम लबजावणी, प्रशासकीय प्रक्रिया आणि पात्रतेचे निकष याबाबत स्पष्टता (पान ४ वर)

आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे नवे दर

जिरायती शेती ₹११,००० प्रति हेक्टर
बागायती शेती ₹२२,००० प्रति हेक्टर
फळबागा ₹३०,००० प्रति हेक्टर
मृत व्यक्तीच्या कुटुंबाला ₹८ लाख
मोठे पशुधन ₹५०,०००
पूर्ण पडझड घर ₹१.६० लाख

विधान परिषद निवडणुक निकालांच्या अभ्यासासाठी काँग्रेसची समिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बाळासाहेब थोरात यांचा समावेश

मुंबई : नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकांच्या निकालांचा सखोल अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. या समितीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा अहिल्यानगर जिल्ह्यातील बाळासाहेब थोरात यांच्यासह खासदार चंद्रकांत हंडोरे, आरिफ नसीम खान आणि बी. एम. संदीप यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या समितीच्या माध्यमातून राज्यातील निवडणूक निकालांचा आढावा घेण्याची महत्त्वाची जबाबदारी थोरात यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेवरून ही समिती स्थापन करण्यात आली आहे. नागपूर पदवीधर, पुणे पदवीधर आणि अमरावती शिक्षक मतदारसंघातील निवडणूक निकालांचा समिती अभ्यास करणार आहे.


निवडणुकीतील पक्षाची प्रचार यंत्रणा, विजय-पराभवाची कारणे, पक्षांतर्गत समन्वय आणि प्रचारादरम्यान राहिलेल्या त्रुटींचा समितीकडून आढावा घेतला जाणार आहे. तसेच मागील निवडणुकांचा परिणाम, संघटनात्मक पातळीवरील परिस्थिती आणि भविष्यातील निवडणुकांसाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबतही समिती शिफारसी करणार आहे. समितीला तीन आठवड्यांच्या आत आपला सविस्तर अहवाल राज्याचे काँग्रेस प्रभारी डॉ. सिरीवेल्ला प्रसाद यांच्याकडे सादर करायचा आहे. (पान ४ वर)

४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान हर्बल कुंभ

पतंजलीचे आयोजन : हिमालय परिसरात देशभरातील शेतकरी, कृषितज्ज्ञांचा भरणार कुंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

हरिद्वार : पतंजलीच्या वतीने ४ ते ६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत भव्य हर्बल कुंभ, जडीबुटी कृषी मेळा आणि धन्वंतरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय महोत्सवात योगऋषी पूज्य स्वामी रामदेव महाराज, पतंजलीचे आचार्य बाळकृष्ण महाराज यांच्यासह विविध राज्यांतील मंत्री, देशभरातील शेतकरी, कृषितज्ज्ञ आणि औषधी वनस्पती क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.



हिमालयातील पौडी गढवाल येथील हर्बल व हिमालय परिसरात हा महोत्सव होणार आहे. पारंपरिक आयुर्वेदिक ज्ञान, औषधी वनस्पतींचे संवर्धन आणि आधुनिक कृषितंत्रज्ञान यांचा संगम घडवून आणणे हा या आयोजनाचा प्रमुख उद्देश आहे.मेळ्यामध्ये औषधी वनस्पती, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, उच्च मूल्याच्या पिकांचे प्रात्यक्षिक, कृषी यंत्रसामग्री, पारंपरिक उत्पादने आणि कृषी प्रक्रिया उद्योगांची प्रदर्शने भरविण्यात येणार आहेत. याशिवाय शेतकरी संवाद, परिसंवाद, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, खरेदीदार-विक्रेता संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पतंजली किसान डायरीचे प्रकाशन हेही या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.औषधी वनस्पतींची लागवड, उत्पादनांचे विपणन, शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण युवक आणि महिलांना कृषी आधारित उद्योगांसाठी प्रोत्साहन देण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

राज्याच्या आरोग्य विभागात १,४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य विभागाने १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवार, ४ नोव्हेंबर रोजी नियुक्ती आदेश वितरणाचा विशेष समारंभ आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश आहे. या नियुक्त्यांमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील ही भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. वैद्यकीय अधिकारी संवर्गातील एकूण २ हजार ५१४ पदांपैकी १ हजार ४४० पदांसाठी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

या नियुक्त्यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांम धील डॉक्टरांची कमतरता दूर होण्यास मदत होईल. विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्याने विविध आजारांवरील उपचार स्थानिक पातळीवर मिळू शकतील. तसेच एमबीबीएस डॉक्टरांमुळे नियमित रुग्णसेवा, प्रसूती सेवा आणि आपत्कालीन उपचार अधिक प्रभावीपणे देता येणार आहेत.विशेषतः ग्रामीण, डोंगराळ आणि आदिवासी भागातील नागरिकांना या नियुक्त्यांचा फायदा होणार आहे. सध्या डॉक्टरांच्या (पान ४ वर)



सांगली जिल्हा बँकेत १० विरुद्ध १०

सत्तेची चावी संजयकाकांच्या हाती!

पडळकर यांच्या एन्ट्रीने सत्तेचा पेच एका मताने ठरणार अध्यक्षपदाचे भवितव्य



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सांगली : सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होताच जिल्ह्याच्या राजकारणात नव्या सत्तासंघर्षाला सुरुवात झाली आहे. २१ सदस्यीय संचालक मंडळात महायुती आणि महाविकास आघाडीला प्रत्येकी १० जागा मिळाल्याने सत्तेचा लंबक अपक्षाच्या एका मतावर येऊन ठेपला आहे. तासगाव सोसायटी गटातून अपक्ष म्हणून विजयी झालेले माजी खासदार संजयकाका पाटील आता सत्तास्थापनेच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्यांच्या पाठिंब्याशिवाय कोणत्याही आघाडीला बहुमताचा आकडा गाठता येणार नसल्याने दोन्ही बाजूंनी राजकीय जुळवाजुळव सुरू झाली आहे.

या निवडणुकीत अनेक दिग्गजांच्या प्रतिष्ठेची लढाई रंगली. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी जत सोसायटी गटातून काँग्रेसचे विनोद पवार यांचा २० मतांनी पराभव केला. तासगावमध्ये संजयकाका पाटील यांनी माजी आमदार सुमनताई पाटील यांचा अवघ्या एका मताने पराभव करत विजय मिळवला. कवठेमहांकाळमध्ये अजित पवार गटाचे अजितराव घोरपडे यांनी टी. व्ही. पाटील यांच्यावर चार मतांनी मात केली, तर मिरजमध्ये काँग्रेसचे अण्णासाहेब कोरे यांनी भाजपचे अनिल शेगूनशे यांचा २६ मतांनी पराभव केला.पडळकरांच्या विजयाने जिल्ह्यातील राजकीय वातावरण अधिक तापले. पारंपरिक धनगरी वेशभूषेत बँकेच्या दारात पोहोचत त्यांनी समर्थकांसह जल्लोष केला. यानंतर त्यांनी जयंत पाटील यांच्यावर निशाणा साधला. जतच्या जनतेने विरोधकांचा करेक्ट कार्यक्रम केल्याचा दावा त्यांनी केला. आमदार सदाभाऊ खोत यांनीही वाळव्याच्या नेतृत्वावर टीका करत जिल्हा बँकेतील प्रस्थापित व्यवस्थेला धक्का बसल्याचे म्हटले. अजितराव घोरपडे यांनीही आपल्याविरोधात राजकीय कट रचल्याचा आरोप केला.

मात्र, या आरोप-प्रत्यारोपांपेक्षा आता अध्यक्षपदाची निवड अधिक महत्त्वाची ठरणार आहे. महाविकास (पान ४ वर)

पक्षनिहाय संख्याबळ	आघाडी / पक्ष	जागा
आघाडी – १०	काँग्रेस – ६	राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)-४

युती -१०
भाजप- ५ शिवसेना (शिंदे गट) -३
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) -२
अपक्ष संजयकाका पाटील -१
एकूण : २१ संचालक । बहुमत : ११

विखे-थोरातांची युती : सत्तेचे गणित आणि अध्यक्षपदाची कसोटी!

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा निकाल हा केवळ संचालक निवडीचा निकाल नाही, तर जिल्ह्याच्या राजकारणातील बदलत्या समीकरणांचा स्पष्ट संकेत आहे. राजकीय आखाड्यात वर्षानुवर्षे एकमेकांसमोर उभे ठाकणारे राधाकृष्ण विखे पाटील आणि बाळासाहेब थोरात सहकाराच्या निमित्ताने एकत्र आले आणि त्यांनी जिल्हा बँकेवरील वर्चस्व कायम केले. २१ पैकी १७ जागांवर सहकार विकास पॅनेलने मिळविलेला विजय हा त्यांच्या राजकीय ताकदीचा पुरावा असला, तरी या निकालाने अनेक प्रश्नही उपस्थित केले आहेत. विशेषतः थोरात गटाचे १२ आणि विखे गटाचे पाच असे संख्याबळ समोर आल्यानंतर आता जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची खुर्ची कोणाकडे जाणार, हा राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

राजकारणात कायमस्वरूपी शत्रू किंवा मित्र नसतात, या विधानाचा प्रत्यय अहिल्यानगरच्या सहकार क्षेत्राने पुन्हा एकदा दिला. विखे आणि थोरात यांच्यातील संघर्ष हा जिल्ह्याच्या राजकारणाचा अनेक वर्षांपासूनचा परिचित भाग आहे. एकमेकांच्या राजकीय वर्चस्वाला आव्हान देणारे हे दोन नेते जिल्हा बँकेसाठी एकत्र आले. या युतीमागे सहकार क्षेत्रावरील नियंत्रण, राजकीय प्रतिष्ठा आणि भविष्यातील सत्तेची गणिते होती, हे नाकारता येणार नाही. मात्र, या एकत्र येण्याचा सर्वांत मोठा फायदा कोणाला झाला, याचा विचार केला तर थोरात गटाचे संख्यात्मक वर्चस्व स्पष्टपणे दिसते. विखे यांना सोबत घेताना थोरातांनी आपले राजकीय वजन कमी होऊ दिले नाही, उलट संचालकांच्या संख्येत आघाडी मिळवली.

नेतृत्वाचे सूत्र कोणाकडे?

निवडणुकीतील विजयापेक्षा आता अध्यक्षपदाची निवड अधिक महत्त्वाची ठरणार आहे. थोरात गटाचे १२ संचालक आणि विखे गटाचे पाच संचालक असे पॅनेलचे संख्याबळ असताना अध्यक्षपदाचा दावा थोरात गटाकडून स्वाभाविकपणे केला जाऊ शकतो. मात्र, जिल्ह्याच्या राजकारणात विखे पाटील यांचे वजन आणि राज्यातील सत्तेतील त्यांचे स्थान दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे अध्यक्षपदासाठी कोणता फॉर्म्युला ठरतो, यावर या युतीचे भवितव्य अवलंबून असेल.

थोरातांना अध्यक्षपद मिळाले तर त्यांच्या राजकीय वर्चस्वाला सहकार क्षेत्रातून आणखी बळ मिळेल. विखे गटाला संधी मिळाली तर कमी संख्याबळ असूनही राजकीय प्रभावाच्या जोरावर त्यांनी महत्त्वाचे पद मिळवल्याचा संदेश जाईल. त्यामुळे ही निवड केवळ पदाची नसून दोन्ही नेत्यांच्या राजकीय



प्रतिष्ठेची कसोटी आहे. निवडणुकीत एकत्र आलेले नेते सत्तेच्या वाटपातही तितक्याच समन्वयाने वागतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

राम शिंदे आणि नीलेश लंके यांची स्वतंत्र ताकद!

या निवडणुकीत प्रा. राम शिंदे आणि खासदार नीलेश लंके यांनीही आपले अस्तित्व अधोरेखित केले. राम शिंदे गटाचे दोन संचालक निवडून येणे ही त्यांच्या राजकीय ताकदीची नोंद आहे. तर खासदार नीलेश लंके यांनी पारनेरमधून विजय मिळवत जिल्हा बँकेत प्रवेश केला. विशेष म्हणजे, मोठ्या नेत्यांच्या युतीच्या राजकारणात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करण्याची संधी लंके यांनी साधली आहे. अकोलेमध्ये आमदार डॉ. किरण लहामटे यांना मिळालेला पराभव हा स्थानिक राजकीय समीकरणांचा वेगळा संदेश देणारा ठरला.

जिल्हा बँकेच्या राजकारणात यापुढे या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरू शकते. सहकार क्षेत्रातील निर्णयांमध्ये त्यांचा सहभाग, सत्ताधारी गटावर ठेवली जाणारी देखरेख आणि अध्यक्षपदाच्या निवडीत त्यांची भूमिका यामुळे आगामी राजकीय समीकरणांना वेगळे वळण मिळण्याची शक्यता आहे.

बिनविरोध निवडीतून सहमती; मतदानातून शक्तिप्रदर्शन!

या निवडणुकीतील ११ बिनविरोध जागा आणि उर्वरित दहा जागांसाठी झालेले मतदान याकडेही राजकीय दृष्टिकोनातून पाहावे लागेल. अनेक मतदारसंघांत आधीच सहमतीचे राजकारण झाले, तर काही ठिकाणी उमेदवारांना प्रत्यक्ष मतदारांच्या कौलाला सामोरे जावे लागले. ९९ टक्क्यांहून अधिक मतदानाने या निवडणुकीतील संस्थात्मक महत्त्व आणि मतदारांचा सहभाग स्पष्ट केला. मात्र, बिनविरोध निवडून आलेल्या संचालकांसाठीही आता जबाबदारीची कसोटी सुरू झाली आहे.

सहकाराच्या नावाखाली सत्ताकारण नको!

जिल्हा बँक ही कोणत्याही राजकीय नेत्याची वैयक्तिक मालमत्ता नाही. जिल्ह्यातील शेतकरी, सहकारी संस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आर्थिक आधार म्हणून या बँकेकडे पाहिले जाते. त्यामुळे निवडणुकीत कोणी किती जागा जिंकल्या, कोणाचा राजकीय प्रभाव वाढला आणि अध्यक्षपद कोणाला मिळाले, यापेक्षा बँकेचा कारभार कसा चालतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना वेळेवर पीककर्ज मिळते का, कर्जवसुलीत मानवी दृष्टिकोन ठेवला जातो का, आर्थिक अडचणीत असलेल्या संस्थांना मदत मिळते का, बँकेच्या व्यवहारात पारदर्शकता राहते का, या प्रश्नांची उत्तरे नव्या संचालक मंडळाला द्यावी लागतील. सहकाराच्या नावाखाली राजकीय सोयीचे निर्णय झाले, तर या युतीच्या विजयाचा अर्थच उरणार नाही.

अहिल्यानगरच्या राजकारणात विखे आणि थोरात यांची एकजूट ही निश्चितच मोठी घटना आहे. मात्र, या युतीची खरी ताकद निवडणुकीतील १७ जागांमध्ये नाही, तर पुढील पाच वर्षांच्या कारभारात दिसली पाहिजे. थोरातांचे संख्याबळ आणि विखेंचा राजकीय प्रभाव यांचा समन्वय जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला नवी दिशा देऊ शकतो. त्यासाठी दोन्ही नेत्यांना परस्परांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा बँकेच्या हिताला प्राधान्य द्यावे लागेल.

शेवटी, निवडणुकीत नेते जिंकले, पॅनेल जिंकले; पण आता शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्याची वेळ आली आहे. अध्यक्षपदाची खुर्ची कोणाला मिळते, यापेक्षा त्या खुर्चीवर बसणारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी किती गांभीर्याने समजून घेतो, हे महत्त्वाचे आहे. कारण जिल्हा बँकेच्या सत्तेचा खरा मालक राजकीय नेता नसून तिच्यावर विश्वास ठेवणारा शेतकरी आहे! राजकीय विजयाचा गुलाल काही दिवसांत उतरतो; मात्र सहकारातील कामाचा हिशेब अनेक वर्षे लक्षात राहतो. सत्ताधारी गटाने आता हे लक्षात ठेवावे!

श्रीराम गणेश मंडळाच्या वतीने रिद्धी-सिद्धीसह श्रीगणेश मूर्तीची प्रतिष्ठापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : राहुरी शहरातील कासार गल्ली येथील श्रीराम हिंदू गणेशोत्सव मंडळाच्या वतीने संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर श्रीगणेशाच्या प्रासादिक मूर्तीसह रिद्धी-सिद्धी यंत्राची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यानिमित्त दोन दिवसांच्या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. राजस्थानमधील जौसा येथील बन्सी पहाडपूर दगडात आकर्षक कोरीवकाम करून मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रतिकृती असलेली मूर्ती येथे प्रतिष्ठापित करण्यात आली. मंदिराच्या उभारणी व जीर्णोद्धारासाठी सुमारे २५ लाख रुपये लोकवर्गणीतून खर्च करण्यात आले. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

मोरगाव येथील गुरु अमित प्रभुणे व सहकारी ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडले. आमदार अक्षय कर्डिले यांनी मंदिरास भेट दिली. भाविकांना खिचडी व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिवाजीराव ऊर्फ दादापाटील सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ गेल्या ४० वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत आहे.

वानराच्या उपस्थितीने वेधले लक्ष

धार्मिक सोहळ्यादरम्यान एका वानराने गणेशमूर्तीसमोर नतमस्तक होत भाविकांचे लक्ष वेधले. पूर्णाहुतीपर्यंत उपस्थित राहिलेल्या या वानराने रुद्रपीठातून स्वतः प्रसाद घेतल्याने हा प्रसंग भाविकांमध्ये चर्चेचा विषय ठरला.

माधुरी दीक्षित यांच्या हस्ते अमृतवाहिनी बँकेचा गौरव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : ग्रामीण भागात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना दर्जेदार सुविधा देणाऱ्या संगमनेरच्या सहकारमहर्षी अमृतवाहिनी सहकारी बँकेचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव करण्यात आला. पुणे येथे आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध सिनेअभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या हस्ते बँकेच्या प्रतिनिधींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी ग्रामीण भागात इतके मोठे काम उभे करणे कौतुकास्पद असून, 'ओहो, क्या बात है!' अशा शब्दांत माधुरी दीक्षित यांनी बँकेच्या कामगिरीचे कौतुक केले.

'सर्वत्र टेक्नॉलॉजी'च्या वतीने राज्यातील सुमारे ७०० बँकांच्या कामकाजाचा आढावा घेऊन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणाऱ्या २५ बँकांचा सन्मान करण्यात आला. अमृतवाहिनी बँकेच्या वतीने उपाध्यक्ष ॲड. नानासाहेब शिंदे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी संस्थेचे चेअरमन वल्लभ



भणसाळी, कार्यकारी संचालक मंदार आगाशे आदी उपस्थित होते. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने मागील तीन वर्षांत डिजिटल व्यवहारांना विशेष प्राधान्य दिले आहे. फोन पे, गुगल पे, क्यूआर कोड, मोबाईल ॲप आणि एटीएमच्या माध्यमातून दरमहा ५० ते ६० कोटी रुपयांचे व्यवहार होत आहेत. नुकतीच व्हॉट्सॲप बँकिंग सुविधाही सुरू करण्यात आली आहे. ग्राहकांना ८३०८०८०४८८ या क्रमांकावर 'हाय' संदेश पाठवून बँकेच्या विविध सुविधांचा लाभ घेता येतो.

माधुरी दीक्षित यांनी महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचे महत्त्व अधोरेखित करत ग्रामीण भागातील सहकारी संस्थांचे कार्य नव्या पिढीला प्रेरणा देणारे असल्याचे भांगितले. अमृतवाहिनी बँकेने १ हजार २७५ कोटी रुपयांचा व्यवसायाचा टप्पा पार केल्याबद्दलही त्यांनी विशेष कौतुक केले.

उपाध्यक्ष ॲड. नानासाहेब शिंदे यांनी चेअरमन सुधाकर जोशी यांच्या नेतृत्वाखाली सभासद, शेतकरी आणि ग्राहकांचे हित जपले जात असल्याचे सांगितले. धांदरफळ आणि इगतपुरी तालुक्यातील साकूर येथे दोन नवीन शाखा सुरू करण्यात आल्या असून, पुणे जिल्ह्यातही शाखा सुरू करण्याचा विचार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पुरस्कारामुळे अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे चेअरमन सुधाकर जोशी यांनी सांगितले.

'ओहो, क्या बात है!'

ग्रामीण भागात अमृतवाहिनी बँकेने १ हजार २७५ कोटींचा व्यवसायाचा टप्पा पार करणे कौतुकास्पद आहे. महाराष्ट्राची सहकार चळवळ देशासाठी दिशादर्शक असल्याचे सांगत माधुरी दीक्षित यांनी बँकेच्या कामाचे कौतुक केले.

मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र गुजरातला आंदण दिलाय : ॲड. प्रकाश आंबेडकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

मुंबई : महाराष्ट्रामधील सर्वच काही गुजरातला विकण्याचे सुरू आहे. मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र गुजरातला आंदणच दिले आहे, त्यावरच त्यांचं मुख्यमंत्री पद टिकून आहे. हे ते वारंवार दाखवत असल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे. राज्यातील वृक्षतोड आणि ए .आय डेटा सेंटर या संदर्भात त्यांनी मुंबई येथील पक्षाच्या केंद्रीय कार्यालयात पत्रकार परिषद घेतली.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, सह्याद्रीची रेंज ही अत्यंत इकोसेन्सेटिव्ह आहे. केंद्र सरकारने युनेस्कोनेला हमी पत्र दिले आहे की, या भागात कुठल्याही प्रकारचे डेव्हलपमेंट होणार नाही. त्याचे कारण असे आहे की, सह्याद्रीच्या भागात अनेक नवीन जीव तयार होतात. सह्याद्रीच्या रेंजमध्ये ऑक्सिजन हे ७० टक्क्यांपेक्षा जास्त असते. या रेंजमध्ये काही पॉकेट असे आहेत जे पश्चिम महाराष्ट्र आणि इतर जैविक भागाला जीवदान आहे.भांडवलदारांची मक्तेदारी असलेल्या भांडवलशाहीने भाजप या सत्ताधारी पक्षाला आपल्या खिशात ठेवल्याचे आम्हाला माहीत होते. मात्र, त्यांनी विरोधकांचीही मौन विकत घेतले आहे, हे आमच्या लक्षात आले नव्हते. असे म्हणत त्यांनी विरोधी पक्षांच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली.

भीमाशंकर येथे होत असलेल्या वृक्षतोडीवर त्यांनी संताप व्यक्त केला त्यांनी म्हटले की, टोरंटो सारखे ५ प्रोजेक्ट्स सह्याद्रीत सुरू आहेत. मुख्यमंत्री फडणवीस मुख्यमंत्र्यांच्या पदावरून लोकांना फसवत आहेत. हे सरकार सह्याद्रीचे वाळवंट करायला निघाले आहे.रायगडमध्ये आतापर्यंत ५ प्रोजेक्ट्स सुरू आहेत. यातून तीन चतुर्थांश रायगड जिल्हा बाधित होणार आहे. मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, भीमाशंकरची रेंज ही १५ किलोमीटर आहे. हे अंतर दाखवून त्यांनी वृक्षतोडीला खरं ठरवण्याचा प्रयत्न केला आहे.प्रत्येक प्राणी, जनावरांचा एक झोन असतो, त्याबाहेर तो जात नाही. त्याला जर त्रास दिला तर तो त्यातून बाहेर पडतो. याचे उदाहरण आपण जुन्नर तालुक्यात बघतोय की, बिबट्याचा वावर आणि त्यातून होणारा त्रास आपण बघतोय. वृक्षतोडी संदर्भात आतापर्यंत सरकारने दिलेली आकडेवारी खोटी आहे, या प्रोजेक्ट्ससाठी अडीच लाख झाडं पाडली जाणार आहेत.

अमेरिकेतून सगळे डेटा सेंटर हाकलले जात आहेत. हे सगळे डेटा सेंटर अमेरिकन कंपन्यांचे आहेत आणि अमेरिकन जनताच हे डेटा सेंटर तिथून हाकलून देत आहेत.

पायल झांबरे मृत्यूप्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी : डॉ. नीलम गोऱ्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

मुंबई : पुण्यातील मुकुंदनगर परिसरातील पायल अक्षय झांबरे यांच्या मृत्यूची घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. मुलगी झाल्याच्या कारणावरून विवाहितेचा छळ करणे, हुंडा आणि मालमत्तेसाठी दबाव आणणे, तसेच तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे आरोप गंभीर आहेत. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी विधान परिषदेच्या सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली. या प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता आणि हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार तपास सुरू आहे. पायल यांना मुलगी झाल्यानंतर अपमानास्पद वागणूक दिली जात होती. तसेच जमीन नावावर करून देण्यासाठी दबाव आणि धमक्या दिल्याचे आरोप आहेत. या सर्व बाबींची सखोल चौकशी व्हावी, असे गोऱ्हे यांनी सांगितले. या प्रकरणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्याशी चर्चा केल्याची माहिती त्यांनी दिली. पायल यांच्या माहेरच्या कुटुंबीयांचीही भेट घेऊन विचारपूस करण्यात आली आहे. स्त्री आधार केंद्राच्या कार्यकर्त्या अनिता शिंदे आणि आश्लेषा खंडागळे यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले. सुनांकडून सोने, पैसे आणि मालमत्तेची मागणी करून त्यांचा छळ करण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. सुनांना सन्मानाने जगू द्या. मुलीचा संसार टिकावा म्हणून माहेरच्या कुटुंबीयांनीही तिच्यावर अन्याय सहन करण्यासाठी दबाव आणू नये. तिच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन गोऱ्हे यांनी केले. या प्रकरणातील आरोपींना ७ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. धमक्या, मानसिक छळ आणि मालमत्तेसाठी केलेल्या दबावाचे पुरावे तपासात समोर आणून दोषींवर कठोर कारवाई करावी. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हरीगाव आठवडे बाजारात मोकाट जनावरांचा शेतकरी बाजारकरूना त्रास



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : रविवारी हरेगावच्या आठवडे बाजारामध्ये आता ऐन दिवाळीचा बाजार असून बाजारात अनेक व्यापारी बाहेरून शेती माल ,धान्य विक्रीसाठी घेऊन येतात परंतु सध्या बाजारामध्ये मोकाट जनावरांची संख्या खूप मोठी वाढली असून व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांना बाजारकरू महिला पुरुष यांना खूप त्रास होत आहे कधी कधी तर बाजारात जनावराची जर भांडणे सुरू झाली तर शेतकरी व्यापारी हवालदिल होत आहे त्यामुळे हरीगाव ग्रामपंचायत यांनी ज्यांना हा बाजारचा ठेका दिला आहे त्यांना सांगून त्या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याच्या सूचना द्याव्यात सदर जनावरे बाजाराच्या बाहेर घालवून देण्याची व्यवस्था करावी .ग्रामपंचायतने चारी बाजूने कंपाउंड या बाजारला केले आहे परंतु तरीही त्या कंपाऊंडमध्ये जनावर येत आहेत ग्रामपंचायतने काळजी घेतली पाहिजे ही जनावरे बाजारकरूंचा भाजीपाला ओढतात घेऊन जातात तसेच जे भाजीपाला विकतात तेथे जाऊन बिनधास्त पाहिजे ती भाजी ओढतात उचलून घेऊन जातात .अशी दृश्ये दिसतात.अशा प्रकारे जनावरांचा सतत होणारा त्रास व गैरसोय दूर करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिनगारे यांनी केली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत गडाख व जावळे विजयी ; कार्यकर्त्यांकडून गुलालाची उधळण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई :शिरेगाव : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या अटीतटीच्या चुरशीच्या निवडणुकीत बिनविरोध झालेले माजी मंत्री शंकररावजी गडाख व अटीतटीच्या निवडणुकीत कारभारी जावळे यांचा दणदणीत विजय झाल्याने शनिशिंगणापूर व मुळा कारखाना कार्यस्थळावर कार्यकर्त्यांनी घोषणा देत गुलालाची उधळण करून आनंद उत्सव साजरा करण्यात आला याप्रसंगी गडाख म्हणाले, कार्यकर्त्याची ताकद ही माझी ऊर्जा



असून शेतकऱ्याची कामे गतिमान करणार असल्याचे सांगितले.

नवनिर्वाचित संचालक कारभारी जावळे म्हणाले, सभासदांनी मतदारांनी माझ्यावर टाकलेला विश्वासस पात्र राहून हक्काने कामे सांगावे व माजी मंत्री शंकररावजी गडाख यांच्या प्रेरणेमुळे मी संचालक झाल्याचे प्रतिपादन केले. यावेळी चांदा ग्रामस्थ, सेवा सोसायटी, कांगोणी सेवा सोसायटी, आदी सेवा संस्थेकडून, कार्यकर्तेकडून साध्या पद्धतीने सत्कार गडाख व जावळे यांनी स्वीकारला.

यंदा माझ्या बळीराजाची दिवाळी खरंच गोड होणार का?

मदतीची घोषणा झाली ; पण शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची प्रतीक्षा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा आणि गोडव्याचा सण! प्रत्येक घरात दिवे लागतात, फराळ तयार होतो, नवीन कपडे घेतले जातात. मात्र महाराष्ट्रातील बळीराजाच्या घरात यंदा दिवाळीचा दिवा पेटणार तरी कसा, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

कधी पावसाची ओढ, तर कधी अतिवृष्टीचा फटका... कधी पिकांवर रोगराई, तर कधी बाजारभावातील घसरण! वर्षभर शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याच्या हातात शेवटी काय उरते? बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीवर लाखो रुपये खर्च करूनही उत्पन्नाची खात्री नाही. त्यामुळे यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसाठी आनंदापेक्षा चिंतेची ठरत आहे.

सरकारची ७५०० कोटींची मदत; बळीराजाला दिलासा मिळणार?

राज्य मंत्रिमंडळाने २७ ऑक्टोबर २०२६ रोजी महत्त्वाचा निर्णय घेत दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्यासाठी ७५०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. ३३ टक्क्यांपेक्षा अधिक पीक नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना ही मदत थेट डीबीटीडरे खात्यात जमा करण्याचे नियोजन आहे.

या निर्णयामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक आधार मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र पाच हजार रुपयांत शेतकऱ्याचा संपूर्ण हंगामाचा खर्च किंवा नुकसान भरून निघणार आहे का, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे.

घोषणा नको, प्रत्यक्ष मदत हवी!

शेतकऱ्याला केवळ मदतीच्या घोषणा नकोत. त्याला वेळेत नुकसानभरपाई हवी आहे. शेतमालाला योग्य बाजारभाव हवा आहे. कर्जाचा बोजा कमी व्हावा, वीजबिलात सवलत मिळावी आणि पुढील हंगामासाठी आर्थिक पाठबळ मिळावे, ही त्याची अपेक्षा आहे.

विशेषतः सोयाबीन, कापूस, कांदा आणि इतर पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना बाजारभावाचा प्रश्न सतावत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य दर मिळत नसेल, तर शेतकऱ्याच्या हातात पैसा उरणार तरी कसा?

बळीराजाच्या घरात आनंदाचा दिवा कधी लागणार?

दिवाळीच्या निमित्ताने सरकारने जाहीर केलेली मदत प्रत्यक्ष पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेत जमा होणे गरजेचे आहे. मदत वाटपात पारदर्शकता असावी. पात्र शेतकरी वंचित राहू नये. बँकांनी मदतीची रक्कम कर्जवसुलीसाठी वळती करू नये, याचीही प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी.

कारण शेतकरी हा केवळ अन्नदाता नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. त्याच्या कष्टावर बाजारपेठा चालतात, उद्योगधंदे चालतात आणि प्रत्येकाच्या ताटात अन्न पोहोचते.

शेवटी एकच प्रश्न...

यंदा बळीराजाच्या घरात दिवाळीचा फराळ गोड होणार की कर्जाच्या चिंतेतच त्याची दिवाळी जाणार? सरकारने मदतीची घोषणा केली आहे. आता त्या घोषणेचे रूपांतर प्रत्यक्ष दिलास्यात होणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला आश्वासनांची नव्हे, तर हक्काच्या मदतीची अपेक्षा आहे.

बळीराजा सुखी तर महाराष्ट्र सुखी!

यंदा शेतकऱ्याच्या घरात केवळ पणत्या नव्हे, तर समाधानाचा आणि समृद्धीचा प्रकाश उजळू दे, हीच अपेक्षा!

योगेश कडस्कर
पत्रकार
दैनिक राष्ट्र सह्याद्री

सातासमुद्रापार पोहोचणार फराळाचा गोडवा!

आश्वी खुर्द पोस्टातून जर्मनीला दिवाळी फराळ रवाना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

आश्वी : दिवाळीचा सण म्हटले की घरचा फराळ, आईच्या हातची चव आणि कुटुंबीयांच्या प्रेमाची आठवण प्रत्येकाला येते. नोकरी, व्यवसाय आणि शिक्षणानिमित्त परदेशात



स्थायिक झालेल्या भारतीयांनाही मायदेशातील दिवाळीची ओढ असते. हाच आपुलकीचा गोडवा भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून आता सातासमुद्रापार पोहोचणार आहे.आश्वी खुर्द येथील रहिवासी हौशीराम गायकवाड यांनी जर्मनी येथे स्थायिक असलेल्या आपल्या मुलगा आणि सुनेसाठी घरचा दिवाळी फराळ आश्वी खुर्द उपडाकघरातून आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्टडरे पाठविला. ग्रामीण भागातील पोस्ट ऑफिसमधून थेट परदेशात फराळ पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

पूर्वी आंतरराष्ट्रीय पार्सल पाठविण्यासाठी शहरातील मोठ्या पोस्ट कार्यालयात किंवा खासगी कुरिअर सेवेकडे जावे लागत होते. मात्र, भारतीय डाक विभागाने आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्ट सेवेचा विस्तार ग्रामीण भागापर्यंत केला आहे. त्यामुळे आता उपडाकघर आणि शाखा डाकघरांतूनही परदेशात भेटवस्तू, फराळ व इतर वस्तू पाठविणे शक्य झाले आहे. वाजवी दर, ऑनलाइन मागोवा घेण्याची सुविधा आणि विश्वासार्ह सेवा यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

श्रीरामपूर विभागात सेवेचा विस्तार

श्रीरामपूर विभागातील सर्व उपडाकघरांसह शाखा डाकघरांत आंतरराष्ट्रीय टपाल बुकिंगची सुविधा उपलब्ध आहे. तसेच श्रीरामपूर प्रधान डाकघरात विशेष पार्सल पॅकिंगची सुविधाही सुरू करण्यात आली आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डाक अधीक्षक उमेश जनवाडे यांनी केले.

गावातूनच पाठवा परदेशात फराळ

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांतील मुले-मुली अमेरिका, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, कॅनडा आदी देशांत स्थायिक आहेत. त्यांच्यापर्यंत घरचा फराळ आणि भेटवस्तू पोहोचविण्यासाठी आता तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज नाही. ग्रामीण पोस्ट कार्यालयांतूनही आंतरराष्ट्रीय स्पीड पोस्टची सुविधा उपलब्ध झाली असून नागरिकांनी तिचा लाभ घ्यावा, असे आवाहन आश्वी खुर्दचे सब पोस्टमास्तर अमोल गवांदे यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

दखल

बिरोबा महाराज मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी वैद्य कुटुंबीयाकडून ५१ हजारांची देणगी!

लोणी धामणी : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील श्री बिरोबा महाराज मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी कै. सौ. हौसाबाई पंढरीनाथ वैद्य यांच्या स्मरणार्थ वैद्य कुटुंबीयांकडून ५१ हजार रुपयांची देणगी जाहीर करून सुपूर्द करण्यात आली आहे. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याच्या या उपक्रमाचे जारकरवाडी ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

जारकरवाडी येथील श्री बिरोबा महाराज मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. या कार्याला हातभार लागावा, या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. पंढरीनाथ नेमाजी वैद्य, उद्योजक मा. श्री. नवनाथ पंढरीनाथ वैद्य, उद्योजक मा. श्री. उत्तम पंढरीनाथ वैद्य, सौ. उज्वलाताई प्रकाश लबडे पाटील व वैद्य परिवार यांच्या वतीने कै. सौ. हौसाबाई पंढरीनाथ वैद्य यांच्या स्मरणार्थ ५१ हजार रुपयांची देणगी देण्यात आली. गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी मंदिरांचा जीर्णोद्धार महत्त्वाचा असून, अशा सामाजिक उपक्रमांमधून गावाच्या विकासाला हातभार लागतो. वैद्य कुटुंबीयांनी दिलेल्या या आर्थिक योगदानामुळे मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याला निश्चितच बळ मिळणार आहे.या देणगीबद्दल बिरोबा नवरात्र उत्सव मंडळ, जारकरवाडी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने वैद्य कुटुंबीयांचे हार्दिक आभार मानून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

धानोरमध्ये मिठाई विक्री केंद्रावर एफडीएची कारवाई; ३०३ किलो बर्फी नष्ट

आळंदी : सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या (ऋअ) पुणे विभागाने धानोर (ता. खेड) येथे मिठाई विक्री केंद्रावर कारवाई केली. या कारवाईत संशयित निकृष्ट दर्जाची, लेबल नसलेली तसेच खरेदीची बिले उपलब्ध नसलेली तब्बल ३०३ किलो बर्फी जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आली. या साठ्याची किंमत १ लाख २१ हजार २०० रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेंतर्गत २ नोव्हेंबर रोजी अन्न सुरक्षा अधिकारी एच. आर. मारेवार यांनी आळंदी-मार्कळ रस्त्यावरील धानोर येथील माऊली कॉम्प्लेक्समधील मे.आर.बिकानेर मिठाई या विक्री केंद्राची तपासणी केली. यावेळी दुकानात ३०३ किलो बर्फीसह कलाकंद हा मिठाईचा पदार्थ आढळून आला. तपासणीदरम्यान बर्फीचा साठा संशयित निकृष्ट दर्जाचा असल्याचे, तो खोलीच्या तापमानावर साठवून ठेवल्याचे आणि त्यावर आवश्यक लेबलिंग नसल्याचे निदर्शनास आले. तसेच मिठाई खरेदीची बिलेही विक्रेत्याकडे उपलब्ध नव्हती. बर्फी हा नाशवंत अन्नपदार्थ असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी म्हणून प्रशासनाने संपूर्ण ३०३ किलो बर्फीचा साठा जागेवरच नष्ट केला. तर कलाकंदचा नमुना तपासणी व विश्लेषणासाठी घेण्यात आला आहे. क्षेत्रीय सहाय्यक आयुक्त एस. एन. चट्टे आणि सहआयुक्त (अन्न) एस. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.दरम्यान, मिठाई विक्रेत्यांनी अन्नपदार्थांची योग्य पद्धतीने साठवणूक करावी, आवश्यक लेबलिंग करावे तसेच खरेदीची बिले व संबंधित कागदपत्रे उपलब्ध ठेवावीत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने केले आहे. अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांविरोधात यापुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विद्यार्थिनी, आयटीएन्सशी संवाद

पुणे : पुणे मेट्रोच्या नव्या मार्गाचे उद्घाटन आणि पुणे मेट्रो फेज-२ च्या भूमिपूजन कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी ते हिंजवडी फेज -२ असा मेट्रोतून प्रवास केला. या नव्या मार्गावरील पहिले तिकीट मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्वतः घेऊन मेट्रो प्रवासाचा अनुभव घेतला.

यावेळी पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी मुख्यमंत्र्यांना मेट्रो मार्ग, स्थानके आणि प्रकल्पाच्या विविध वैशिष्ट्यांची माहिती दिली. या प्रवासात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.या प्रवासाचे विशेष आकर्षण म्हणजे पिंक मेट्रोचे संचालन महिला ट्रेन पायलटकडे होते. लीड ट्रेन पायलट प्रगती बिरादार यांनी मेट्रोचे सारथ्य केले, तर ट्रेन पायलट ऐश्वर्या सूर्यपूजारी यांनीही या प्रवासात महत्त्वाची भूमिका बजावली. महिला कर्मचाऱ्यांच्या सक्षम सहभागातून आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील महिलांच्या योगदानाचे दर्शन यानिमित्ताने घडले.प्रवासादरम्यान मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शाळकरी विद्यार्थिनी, आयटीएन्स यांच्याशी संवाद साधला. मेट्रो प्रवासाचा अनुभव, उपलब्ध सुविधा आणि नव्या मार्गामुळे दैनंदिन प्रवासात होणारे फायदे याविषयी त्यांनी जाणून घेतले. मुख्यमंत्री व मान्यवरांनी हिंजवडी फेज-२ मेट्रो स्थानकापर्यंत सुमारे सहा किलोमीटरचा प्रवास केला.महिला ट्रेन पायलटच्या नेतृत्वाखाली झालेला हा प्रवास आणि विद्यार्थिनींसह विविध क्षेत्रांतील नागरिकांशी मुख्यमंत्र्यांनी साधलेला संवाद यामुळे नव्या मेट्रो मार्गाच्या उद्घाटनानंतरचा हा प्रवास विशेष ठरला.

पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे विकासाला नवी गती मिळणार : प्रधानमंत्री

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआर क्षेत्र २०३० पर्यंत देशाचे महत्त्वाचे मोबिलिटी केंद्र बनेल:मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

- देशातील मेट्रोचे जाळे १२०० किलोमीटरवर; २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू
- 'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'चे भूमिपूजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पुणे : पुणे शहराच्या विकासाला आणि शहरातील वाहतुकीला पुणे मेट्रोच्या विस्तारामुळे नवी गती मिळणार आहे. हिंजवडी ते शिवाजीनगरदरम्यान मेट्रो सेवा सुरू झाल्यामुळे पुण्यातील मोठ्या आयटी क्षेत्राला अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल. तसेच शहरातील जुन्या आणि नव्या भागांमधील संपर्क अधिक मजबूत होईल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

'माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गिका-३'चे उद्घाटन आणि 'पुणे मेट्रो टप्पा-२'च्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, केंद्रीय मंत्री मनोहर लाल (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, पिंपरी चिंचवड महापौर रवी लांडगे, खासदार श्रीरंग बारणे उपस्थित होते.

पुणे हे आयटी, ऑटोमोबाईल, फार्मा, स्टार्टअप, नवोपक्रम आणि उत्पादन क्षेत्रातील महत्त्वाचे केंद्र असून, मेट्रोच्या वाढत्या सुविधांमुळे शहराच्या आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे नमूद करून प्रधानमंत्री म्हणाले, देशात २०१४ मध्ये केवळ २४८ किलोमीटरचे मेट्रो मार्ग कार्यरत होते. आज हे जाळे सुमारे १२०० किलोमीटरपर्यंत विस्तारले असून, २६ शहरांमध्ये मेट्रो सेवा सुरू आहे. दररोज एक कोटीहून अधिक प्रवासी मेट्रोने प्रवास करीत आहेत. भारतीय मेट्रो नेटवर्क जगातील पहिल्या तीन मोठ्या मेट्रो नेटवर्कमध्ये गणले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्रात २०१४ मध्ये केवळ १० ते ११ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू होता. आज सुमारे २०० किलोमीटर मेट्रो मार्ग सेवेत असून, ६८० किलोमीटरहून अधिक मार्गांची कामे सुरू आहेत. राज्यात मेट्रो पायाभूत सुविधांवर अडीच लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली असल्याचे श्री. मोदी म्हणाले.

मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचतो, शहराची उत्पादकता वाढते आणि त्यातून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळते. पुणे मेट्रोचा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर उभारण्यात आला असून, सरकार आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नांतून विकासाची नवी संधी निर्माण होत आहे. शहरांची स्पर्धात्मकता आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आधुनिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था महत्त्वाची असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. देशातील शहरांना विकासाची केंद्रे बनविण्यासाठी केंद्र सरकारने एक लाख कोटी रुपयांच्या अर्बन चॅलेंज फंडला मंजुरी दिली आहे. या माध्यमातून आगामी काळात शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होणार आहे. तसेच गेल्या १० ते १२ वर्षांत ५० कोटी लोकांना गरिबीतून बाहेर पडण्यास यश आल्याचा उल्लेख जागतिक बँकेच्या अहवालाच्या संदर्भाने त्यांनी केला. पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, विमानतळ, मेट्रो, वीज, पाणी आणि गॅस पाइपलाइनमधील गुंतवणुकीमुळे रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे प्रधानमंत्री मोदी म्हणाले.

महाराष्ट्रातील प्रतिकूल हवामानामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र आणि राज्य सरकार संवेदनशीलतेने उभे असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. ते म्हणाले, शेतकऱ्यांनी काळजी करू नये, संकटाच्या काळात सरकार त्यांना मदत करेल. दिवाळीच्या सणात दुष्काळग्रस्त आणि संकटात असलेल्या शेतकरी कुटुंबांचाही विचार करून त्यांच्या घरातही सणाचा आनंद निमित्त होण्यासाठी सर्वांनी सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने दिवाळी पहाट कार्यक्रमातुन रसिकांना मिळणार सांगितीक मेजवानी

नितीन यादव : राष्ट्र सह्याद्री

सासवड : या आठवड्यात साजरा होत असलेल्या आनंददायी दीपावलीचा सण सासवड शहारात होणाऱ्या दिवाळी पहाट कार्यक्रमामुळे सासवडकर रसिकांना संगीताची मेजवानी देणारा ठरणार आहे. गेली २१ वर्षे सातत्याने दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या सासवड शहर पत्रकार संघाने या वर्षीही महाराष्ट्र शासन

सांस्कृतिक संचालनालयाच्या सहकार्याने स्वर दीपावली या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात सोमवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी पहाटे साडे पाच वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार आहे झी सारेगमप महाविजेता डॉ अभिजित कोसंबी, संगीत सम्राट महासंग्राम विजेता रविंद्र खोमणे व सूर नवा ध्यास नवा ची विजेती राधा खुडे ही दिग्गज गायक मंडळी यात सादरीकरण करणार आहेत. गेली अनेक वर्षे कौतुकास पात्र ठरलेल्या या कार्यक्रमास रसिकांनी मोठया संख्येने हजेरी लावावी असे आवाहन शासनाच्या सांस्कृतिक विभागाचे संचालक प्रशांत कैलास खेडेकर व पत्रकार संघाने केले आहे. सासवड येथील श्री हनुमान भजनी मंडळाच्या वतीनेही संत व लोकवाणी वर आधारित शाहीर रामानंद उगले यांचा भूपाळी ते भैरवी या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी ५ नोव्हेंबरला पहाटे साडेपाच वाजता करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्रा संदिप टिळेकर यांनी दिली.सासवडच्या सोपान नगर मधील गणेशबाग येथे प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरिय विश्व् विद्यालय सासवड यांच्या वतीने देखील स्वर संध्या हा सांगितीक कार्यक्रम बुधवारी ११ रोजीसायंकाळी सहा वाजता होत असल्याची माहिती केंद्राच्यानिलिमादीदी यांनी दिली. राजेंद्र दुरकर व सहकारी हा कार्यक्रम सादर करणार आहेत. या सर्व कार्यक्रमांना रसिकांनी हजेरी लावून आंनद द्विगुणित करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पीएमआर-०१ स्थानकातील गळतीचं 'गुपित' उलगडलं!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पीएमआर-०१ मेट्रो स्थानकात मेझानाइन मजल्यावर अचानक दिसलेल्या पाणीगळतीमुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. नव्याने उभारलेल्या स्थानकातच पाणी गळू लागल्याने बांधकामाच्या दर्जाबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. मात्र, या गळतीमागे संरचनेतील कोणताही दोष नसून पावसाळी पाण्याचा निचरा करणारा पाइप तात्पुरता तुंबणे हेच खरे कारण असल्याचा खुलासा पीएमआरडीएने केला आहे. स्थानकाच्या प्रवेश संरचनेवरील टेरेस स्लॅब खुल्या आकाशाखाली असल्याने पावसाचे सर्व पाणी थेट त्यावर पडते. हे पाणी वाहून नेण्यासाठी बसवलेल्या पाइपमध्ये अडथळा निर्माण झाल्याने पाणी पुढे सरकलेच नाही. परिणामी, स्लॅबवर पाणी साचत गेले आणि काही वेळातच ते ओसंडून वाहू लागले. हे साचलेले पाणी स्थानकाचा मुख्य ढाचा म्हणजेच स्टेशन बॉक्स आणि प्रवेश संरचना यांच्यामधील फटीतून आत झिरपले आणि थेट मेझानाइन मजल्यावर गळताना दिसू लागले. ही बाब निदर्शनास येताच प्राधिकरणाच्या यंत्रणेने तातडीने पाहणी करून पाइपमधील अडथळा दूर केला. त्यानंतर पावसाच्या पाण्याचा निचरा पुन्हा सुरळीत सुरू झाला असून, गळतीची समस्या मार्गी लागली आहे. ही गळती केवळ निचरा पाइपमधील तात्पुरत्या अडथळ्यामुळे झाली होती. स्टेशन बॉक्स अथवा प्रवेश संरचनेच्या कोणत्याही संरचनात्मक घटकात दोष नाही, याची आम्ही खात्री देतो, असे पीएमआरडीएच्या मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी स्पष्ट केले.

तुंबलेल्या पाइपमुळे साचलं पाणी, संरचना पूर्णपणे सुरक्षित

दगडूशेठ गणपती ट्रस्टतर्फे कात्रजमध्ये तिसरे मोफत आरोग्य सेवा केंद्र सुरू

जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत आंबेगाव खुर्द कात्रज येथे आरोग्य सुविधा

गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री

पुणे : ईश्वराची सेवा केवळ मंदिरातील पूजेपुरती मर्यादित नसून, गरजू माणसाच्या दुःखात सहभागी होऊन त्याला आधार देण्यातही ईश्वरसेवेचा भाव सामावलेला आहे. मानवसेवा हीच ईश्वर सेवा या विचारातून देवमंदिराकडून मानवसेवेच्या महामंदिराकडे वाटचाल करत श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांनी जय गणेश रुग्णसेवा अभियानाच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा उपक्रम सुरू ठेवला आहे. या अभियानाचा विस्तार करत आंबेगाव खुर्द, कात्रज येथे तिसरे मोफत आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी, कोषाध्यक्ष सुनील रासने, राजेंद्र गावडे, मंगेश सूर्यवंशी, अमोल चव्हाण, विशाल ढनाळ, अजय मोझर, राजू वायकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या केंद्रात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विविध आरोग्य तपासण्या आणि उपचार सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी व सहकार्यांनी याचे नियोजन केले आहे.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांनी जय गणेश रुग्णसेवा अभियानाच्या माध्यमातून आरोग्यसेवेचा उपक्रम सुरू ठेवला आहे. या अभियानाचा विस्तार करत आंबेगाव खुर्द, कात्रज येथे तिसरे मोफत आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, अभियानांतर्गत यापूर्वी सारसबागेजवळील हिराबाग कोठी आणि धनकवडीतील काशिनाथ पाटील नगर येथे दोन आरोग्य सेवा केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. आता तिसरे केंद्र स. नं. ४४/५, गगनगिरी हिल्स, अचल फार्मजवळ, सच्चाई माता मंदिर परिसर, पाण्याच्या टाकीजवळ, आंबेगाव खुर्द, कात्रज येथे सुरू झाले आहे.

या केंद्रामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, विविध प्रकारच्या रक्त तपासण्या, जनरल ओपीडी, औषधोपचार आणि ईसीजी तपासणीची सुविधा उपलब्ध असेल. तसेच श्रवण क्षमता तपासणी व श्रवण यंत्र वाटप, कृत्रिम अवयव व वैद्यकीय उपकरणांचे वाटप, फिजिओथेरपी, ऑक्युप्रेशर, ऑक्युपंचर उपचार आणि लसीकरण अशा सुविधाही दिल्या जाणार आहेत. याकरिता पुणे मनपा आरोग्य विभागाचे विशेष सहकार्य लाभले आहे. हे केंद्र दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू राहणार असून दर रविवारी बंद राहील.

आशियातील पहिल्या 'फोम' औषधनिर्मितीत 'साबळे'चा ठसा!

अनिकेत नितीन काळे । राष्ट्र सह्याद्री

सासवड : ज्या महाविद्यालयात औषधनिर्माणशास्त्राचे पहिले धडे गिरवले, त्याच महाविद्यालयाचे विद्यार्थी जेव्हा कंपनीच्या दारात उभे ठाकले, तेव्हा तिथल्या उत्पादन प्रमुखाच्या चेहऱ्यावरचा आनंद लपून राहिला नाही. हा भावस्पर्शी प्रसंग अनुभवला पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे औषधनिर्माणशास्त्र (पदविका) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी, छत्रपती संभाजीनगर येथील ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स प्रा. लि. या बहुराष्ट्रीय कंपनीच्या औद्योगिक भेटीदरम्यान. या भेटीत विद्यार्थ्यांनी औषधनिर्मितीची प्रत्यक्ष प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रणाची काटेकोर व्यवस्था आणि अत्याधुनिक यंत्रसामग्री जवळून पाहिली. पुस्तकातील संकल्पना प्रत्यक्ष उत्पादन विभागात आकार घेताना पाहणे, हा विद्यार्थ्यांसाठी वेगळाच अनुभव ठरला. या भेटीचा खरा केंद्रबिंदू ठरले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. प्रशांत पाटील (बी. फार्म., १९९७). सध्या ग्लेनमार्कमध्ये उत्पादन प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळणाऱ्या पाटील यांनी आशियातील पहिल्या 'फोम' औषध सूचीकरणाच्या निर्मितीत मोलाचे योगदान दिले आहे. आपल्याच महाविद्यालयाचा विद्यार्थी या उंचीवर पोहोचल्याचे पाहून विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा ऊर अभिमानाने भरून आला. विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधताना पाटील यांनी महाविद्यालयातील दिवसांच्या आठवणींना उजाळा देत, येथे मिळालेल्या शिस्त, नैतिक मूल्ये आणि संस्कारांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जुन्या महाविद्यालयाच्या नव्या पिढीशी भेट होणे हा आपल्यासाठी आनंदाचा क्षण असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

> **साबळे महाविद्यालयात मिळालेली शिस्त, नैतिक मूल्ये आणि संस्कार हीच माझ्या आजवरच्या वाटचालीची खरी शिदोरी ठरली. आपल्याच महाविद्यालयाच्या नव्या पिढीला भेटण्याचा आनंद शब्दांत सांगता येणार नाही.**
>
> **-श्री. प्रशांत पाटील, उत्पादन प्रमुख, ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स**

खेलो इंडिया'च्या माध्यमातून खेळ गावागावांत पोहोचला-मुख्यमंत्री फडणवीस

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे आयोजित ४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेचा समारोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : देशातील क्रीडा क्षेत्रात मोठे परिवर्तन होत असून, 'खेलो इंडिया'च्या माध्यमातून खेळ ग्रामीण भागातील गावागावांत पोहोचला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे आयोजित ४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धा (मुख्यमंत्री चषक) समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रांत पाटील, आमदार शंकर जगताप, मनपा आयुक्त नवल किशोर राम, क्रिडा आयुक्त दीपक सांगला,बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव सुबिंदर सिंह गिल, महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष संदीप जोशी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या क्रीडा परिसंस्थेमध्ये बालेवाडी येथील क्रीडा संकुल महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'खेलो इंडिया' स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे खेळाडू सातत्याने चांगली कामगिरी करून पदके मिळवत आहेत. राज्य शासनाने 'मिशन लक्ष्यवेध'च्या माध्यमातून विविध खेळांसाठी उत्कृष्ट प्रशिक्षण देणारी केंद्रे सुरू केली आहेत. बास्केटबॉल हा महाराष्ट्रातील लोकप्रिय खेळ असून, राज्याने देशाला अनेक दर्जेदार खेळाडू दिले आहेत. अशा राष्ट्रीय स्पर्धांमुळे खेळाडूंना अनुभव आणि राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळते. महाराष्ट्र बास्केटबॉल संघटनेने या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केल्याचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

४१ व्या युवा राष्ट्रीय बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या (मुख्यमंत्री चषक) पारितोषिक वितरण समारंभात वैयक्तिक आणि सांघिक गटातील विजेत्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. मुलींच्या गटात तामिळनाडूने, तर मुलांच्या गटात उत्तर प्रदेशने विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात कर्नाटक संघाला उपविजेतेपद मिळाले. मुलांच्या गटात मध्य प्रदेश संघाने उपविजेतेपद मिळविले.



आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारतीय खेळाडूंच्या कामगिरीचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, यावेळी भारताने ४८ पदके मिळविली. विशेष म्हणजे १७ राज्यांतील खेळाडूंनी पदकांची कमाई केली. कबड्डी, नेमबाजी आणि तिरंदाजीसारख्या खेळांत सामान्य कुटुंबांतील खेळाडूंनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश मिळविले. खेळाडूंची परिस्थिती नव्हे, तर त्यांची जिद्द, मेहनत आणि खेळाप्रती असलेली निष्ठा महत्त्वाची असते. सर्व विजेत्या आणि सहभागी संघांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले. महासंघाचा संघ यंदा अंतिम फेरीपर्यंत पोहोचू शकला नसला, तरी त्यातून निराश होण्याचे कारण नाही. खेळात जय-पराजय होत असतो. पुढील स्पर्धेत अधिक चांगली कामगिरी करण्याची संधी खेळाडूंना मिळेल.

खेळाडूंमध्ये जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि खिलाडूवृत्ती असणे महत्त्वाचे असून, पराभवानंतरही न थांबता प्रयत्न करणारे खेळाडूच भविष्यात विजयाचे मानकरी ठरतात, असेही मुख्यमंत्री म्हणाले.या स्पर्धेत सहभागी झालेल्या विविध राज्यांतील संघांमधून भारताचे वैविध्य आणि एकात्मतेचे दर्शन घडते. दक्षिण आणि उत्तर भारतातील राज्यांचे खेळाडू एकत्र येऊन देशाच्या क्रीडा क्षेत्राचा गौरव वाढवत आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

कुलविंदर सिंग गिल म्हणाले, महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेच्या माध्यमातून राज्यातील मुलांच्या आणि मुलींच्या संघांची राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी सातत्याने उंचावत असून, खेळाडू राष्ट्रीय पदकांसह आंतरराष्ट्रीय स्तरावरही देशाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांतून उभारण्यात येत असलेल्या बास्केटबॉल स्टेडियममध्ये आगामी काळात राष्ट्रीय स्पर्धेबरोबरच आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेचेही आयोजन व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष संदीप जोशी यांनी प्रास्ताविक केले.

युवा राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशचे विजेतेपदावर शिक्कामोर्तब. यावेळी जपान येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये रौप्यपदक मिळविणाऱ्या महाराष्ट्राच्या यशदीप भोगे याचाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

पान १ वरुन

सांगली जिल्हा बँकेत १० विरुद्ध १०

आघाडीकडून काँग्रेसचे डॉ. विश्वजित कदम आणि जयंत पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे. तर महायुतीकडून पडळकर, घोरपडे यांच्यासह प्रमुख नेत्यांनी हालचाली सुरू केल्या आहेत. महायुतीला संजयकाका पाटील यांनी साथ दिल्यास सत्तेचा मार्ग मोकळा होऊ शकतो. दुसरीकडे, त्यांनी महाविकास आघाडीला पाठिंबा दिल्यास सत्तेचे पारडे त्या बाजूला झुकणार आहे.

त्यामुळे संजयकाका कोणाच्या गोटात जाणार, की स्वतंत्र भूमिका घेत सत्तेच्या वाटाघाटींमध्ये आपले महत्त्व वाढवणार, हा उत्सुकतेचा विषय आहे. सांगली जिल्हा बँकेच्या निवडणुकीचा निकाल लागला असला, तरी खरा राजकीय सामना आता सत्तास्थापनेच्या मैदानात रंगणार आहे.

विधान परिषद निवडणुक निकालांच्या अभ्यासासाठी काँग्रेसची समिती

या अहवालाची प्रत प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही दिली जाणार आहे. अहिल्यानगरच्या दृष्टीने बाळासाहेब थोरात यांचा समितीतील समावेश महत्त्वाचा मानला जात आहे. महत्त्वाच्या निवडणुकांच्या निकालांचा अभ्यास आणि पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे.

जिरायतीला ११ हजार, फळबागांना ३० हजार...

आवश्यक आहे. विशेषतः १ एप्रिल २०२६ नंतर झालेल्या नुकसानीला वाढीव दर लागू होणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. निकष वाढले, आकडे बदलले; आता गरज आहे ती प्रत्यक्ष अंमलबजावणीची! पंचनामे, पात्रता आणि प्रशासकीय प्रक्रियेत शेतकऱ्यांची अडवणूक न होता वाढीव मदत वेळेत मिळाली, तरच केंद्राच्या निर्णयाचा खऱ्या अर्थाने फायदा बळीराजाला होईल.

जिल्हा बँकेवर विखे-थोरातांचे निर्विवाद वर्चस्व!

थोरात गटाचे १२ संचालक निवडून आल्याने बँकेच्या आगामी अध्यक्षपदावर कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. जिल्हा बँकेच्या २१ संचालकपदांपैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरित दहा जागांसाठी सोमवारी मतदान झाले. एकूण ३ हजार ८३७ मतदारांपैकी तब्बल ३ हजार ८०९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ९९.२७ टक्के मतदानामुळे या निवडणुकीतील चुरस स्पष्ट झाली होती. मंगळवारी झालेल्या मतमोजणीत विखे-थोरात सहकार विकास पॅनेलने अपेक्षेप्रमाणे बाजी मारली.

थोरातांचे सर्वाधिक १२ संचालक; विखेंचीही ताकद कायम! या निवडणुकीत थोरात गटाचे १२, तर विखे गटाचे पाच संचालक निवडून आले. त्यामुळे या दोन्ही नेत्यांच्या एकत्रित ताकदीने बँकेतील सत्तेवर पकड निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, थोरात गटाचे संख्याबळ अधिक असल्याने अध्यक्षपदाच्या निवडीत त्यांचा दावा वरचढ मानला जात आहे. मात्र, अध्यक्षपदाची निवड करताना विखे-थोरात यांच्यात कोणते सूत्र ठरते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

। निवडणुकीत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनीही आपले राजकीय अस्तित्व सिद्ध केले. त्यांच्या समर्थकांचे दोन संचालक निवडून आले. दुसरीकडे, खासदार नीलेश लंके यांनी पारनेर मतदारसंघातून विजय मिळवत जिल्हा बँकेत थेट प्रवेश केला. प्रस्थापित राजकीय शक्तींना आव्हान देत त्यांनी मिळवलेला विजय त्यांच्या सहकारातील राजकीय वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

आ. लहामटेंना धक्का; खा. लंके, आ. तनपुरेंनी मारली बाजी! अकोले मतदारसंघात आमदार डॉ. किरण लहामटे यांना पराभवाचा धक्का बसला. संजीवनी शिंदे-गायकर यांनी ४९ मते मिळवत विजय मिळवला, तर लहामटे यांना ३६ मतांवर समाधान मानावे लागले. कर्जतमध्ये ज्योती शिंदे यांनी तुषार पिसाळ यांचा पराभव केला. पारनेरमध्ये खासदार नीलेश लंके यांनी राहुल शिंदे यांच्यावर मात केली. राहुरीत आमदार प्राजक्त तनपुरे यांनी विजय मिळवला. शेतीपूरक संस्था मतदारसंघातून आमदार आशुतोष काळे, महिला राखीवमधून अनुराधा नागवडे आणि संगीता वाघ, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातून वैभव पिचड, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून कारभारी जावळे, तर भटके-विमुक्त प्रवर्गातून गणपतराव सांगळे यांनी विजय मिळवला.

गभविखे-थोरातांनी राजकीय विरोध बाजूला ठेवून सहकारासाठी हातमिळवणी केली. आता या एकजुटीचा फायदा शेतकऱ्यांना किती होतो, हेच त्यांच्या यशाचे खरे मोजमाप ठरणार आहे. विजयाचा गुलाल उधळला गेला; आता अध्यक्षपदाची निवड आणि त्यानंतरचा कारभार जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राची दिशा ठरवणार आहे!

राज्याच्या आरोग्य विभागात १,४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

कमतरतेमुळे अनेक रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. नवीन नियुक्त्यांमुळे ही अडचण कमी होऊन रुग्णांना जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचार मिळण्यास मदत होईल.

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा जवळच उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राधान्य आहे. नवनियुक्त डॉटरांनी सेवाभाव आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन ठेवून काम करावे. या नियुक्त्यांमुळे राज्याची सार्वजनिक आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल.

बँक फसवणूक रोखण्यासाठी पोलीस आणि बँकांमध्ये समन्वय आवश्यक : सोमनाथ वाघचौरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : बँकांमधील फसवणूक, वाढते सायबर गुन्हे आणि आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी पोलीस आणि बँक प्रशासनामध्ये योग्य समन्वय असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले.

श्रीरामपूर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत बँक सुरक्षेबाबत आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पोलीस उपअधीक्षक जयदत्त भंवर आणि शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विशाल खैरे उपस्थित होते.

वाघचौरे म्हणाले की, सध्या प्रत्यक्ष चोरीपेक्षा मोबाईल आणि ऑनलाइन माध्यमातून आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत आहेत. नागरिकांची फसवणूक झाल्यास त्यांनी तातडीने १९३० या सायबर हेल्पलाईनवर किंवा ११२ या पोलीस हेल्पलाईनवर संपर्क साधावा. फसवणुकीनंतर सुरुवातीच्या तीन तासांत तक्रार केल्यास गेलेली रक्कम रोखण्याची किंवा परत मिळवण्याची शक्यता वाढते. बनावट कागदपत्रांच्या



आधारे कर्ज घेऊन बँकांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच सोन्याच्या तारण कर्जात बनावट सोने ठेवून फसवणूक होऊ नये, यासाठी बँकांनी दक्ष राहावे, असेही त्यांनी सांगितले.

पोलीस उपअधीक्षक जयदत्त भंवर यांनी बँकांनी एटीएम केंद्रांवर चोवीस तास प्रशिक्षित सुरक्षा रक्षक नेमावेत. तसेच सीसीटीव्ही आणि सुरक्षा यंत्रणा व्यवस्थित सुरू ठेवाव्यात, असे आवाहन केले. आगामी सण-उत्सव आणि दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता चोरी व लुटमारीच्या घटना टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी बँक परिसरात फिरणाऱ्या संशयित व्यक्तींवर लक्ष ठेवण्याचे आवाहन केले. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि पेन्शनधारकांना लक्ष्य करून एटीएम कार्ड बदलण्याच्या घटना घडतात. त्यामुळे एटीएम केंद्रांवर प्रशिक्षित सुरक्षा रक्षक असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँक ऑफ महाराष्ट्रचे शाखा व्यवस्थापक रवींद्र तनपुरे यांनी केले. यावेळी विविध बँका आणि पतसंस्थांचे अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले, तर आभार रवींद्र तनपुरे यांनी मानले.

बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशासाठी नोंदणीची मुदत ६ नोव्हेंबरपर्यंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महाराष्ट्रातील बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी आणि अर्ज प्रक्रिया ६ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत पूर्ण करावी, असे आवाहन महाराष्ट्र मेडिकल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटरच्या अध्यक्षा अबेदा पी. इनामदार यांनी केले आहे. प्रवेशाची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर असली, तरी नोंदणीची मुदत त्यापूर्वीच संपणार असल्याने विद्यार्थ्यांनी संधी दवडू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या सूचनेनुसार, विद्यार्थ्यांना ऑनलाइन नोंदणी व 'सेशन अप्लाय' प्रक्रिया ६ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करावी लागणार आहे. नोंदणी शुल्क अधिकृत ऑनलाइन सुविधेडरे ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत भरावे लागेल. त्यानंतर आवश्यक मूळ कागदपत्रांच्या रंगीत स्कॅन प्रती अपलोड करून ७ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. केवळ कागदपत्रे अपलोड करून चालणार नसून 'सबमिट' प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास संबंधित प्रवर्गातून अर्जाचा विचार होणार नाही किंवा अर्ज नाकारला जाऊ शकतो. काही प्रवर्गांसाठी प्रवेश परीक्षेतील पात्रतेची किमान पर्सेंटाइल मर्यादा शून्य



करण्यात आली असली, तरी संबंधित नर्सिंग सीईटी परीक्षा दिलेली असणे आणि प्रवेशाच्या अन्य अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. यापूर्वी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा नोंदणी करू नये.

संस्थास्तरावरील दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी ८ ते १० नोव्हेंबरदरम्यान संबंधित महाविद्यालयात अर्ज करावा. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० ही त्याची अंतिम मुदत आहे. नर्सिंग शिक्षणाची इच्छा असलेल्या आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीच्या पर्यायांची माहिती घ्यावी. पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाकडून मार्गदर्शन केले जाईल, असे इनामदार यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी विद्यार्थी व पालकांनी ७४४७४ ४२१०३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

रक्तरंजित संघर्षाचे आरोपी अजूनही मोकाट; पोलिसांची दोन पथके शोधात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : शहरात भरवस्तीत कोयते आणि लोखंडी कत्त्यांनी दोन गटांत रक्तरंजित संघर्ष घडवून आणणारे आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. गंभीर हल्ला, अनेक जखमी आणि दोन्ही बाजूंनी दाखल झालेल्या परस्परविरोधी तक्रारी अशा पार्श्वभूमीवर गुन्ह्याचा तपास सुरू असला तरी अटकेच्या बाबतीत पोलिसांना अद्याप यश आलेले नाही. आरोपींच्या शोधासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, ती विविध ठिकाणी त्यांचा माग काढत आहेत. मात्र, शस्त्रांचा उघडपणे वापर करून दहशत निर्माण करणारे आरोपी अजूनही मोकाट असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे.या घटनेनंतर नागरिकांनीही तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. घटनेचे स्वरूप आणि हल्ल्याची पद्धत पाहता अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. काही वाचकांनी नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर, प्रत्यक्ष घडलेला संघर्ष अत्यंत भयावह असल्याचे सांगितले. शहरात अशा प्रकारे शस्त्रे घेऊन गटागटांत हल्ले होत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही उपस्थित होत आहे.

दोन पथके मैदानात, तरी आरोपी मोकाट!

प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी विनय सोनवणे यांना याबाबत विचारले असता, अद्याप एकाही आरोपीला अटक झालेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरोपींचा कसून शोध घेण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, ही पथके विविध ठिकाणी फिरून संशयितांचा शोध घेत आहेत.

नावात बदल

माझे जुने नाव शंभूराज निमसे असे असून ते बदलून आता शंभुराज विक्रांत निमसे असे नवे नाव आहे पत्ता-सह्याद्री नर्सरी, नगर मनमाड रोड, अस्तगाव.ता -राहाता जिल्हा - अहिल्यानगर. महाराष्ट्र शासन राजपत्र क्र, एम - २६४११५२२

नावात बदल

माझे लग्न पूर्वीचे नाव जयश्री सुदामराव चोळके असे असून लग्नानंतर ते बदलून माझे नाव सौ जयश्री ऋषीराज नळे असे झाले आहे या दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून अन्य दुसरी व्यक्ती नाही प्रतिज्ञापत्र

महिलेची वयोवृद्धाला शिवीगाळ व मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी: तूझा या जमीनीमध्ये काही एक संबध नाही, या शेतामध्ये येवु नको, असे म्हणून एका महिलेने एका वयोवृद्धालमसा शिवीगाळ, दमदाटी करुन मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना, राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे घडली. शिवाजी भानुदास कराळे, वय ६४ वर्षे, हे राहुरी शहरातील करपे इस्टेट, बिरोबा नगर येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. शिवाजी कराळे यांनी राहुरी तालुक्यातील डिग्रस येथील भिंगारदे यांची शेतजमीन दोन वर्षापूर्वी खरेदी केली आहे. मागील तीन महीन्यापासून शिवाजी कराळे हे त्यांच्या शेतात गेल्यावर आरोपी राजश्री भिंगारदे हि कराळे यांना जमीनीमध्ये जाण्यापासून रोखत असून शिवीगाळ दमदाटी करत आहे. शिवाजी कराळे हे त्यांच्या शेतात काम करत असताना तेथे आरोपी राजश्री भिंगारदे हि आली व म्हणाली कि, तूझा ह्या जमीनीमध्ये काही एक संबध नाही, तु ह्या शेतामध्ये येवु नको. असे असे म्हणून तीने शिवाजी कराळे यांना शिवीगाळ, दमदाटी करुन मारहाण केली. तसेच शेतातील पाईप लाईन कुऱ्हाडीने तोडून नूकसान केले. त्यानंतर तू जर शेतामध्ये आला तर तुझ्या डोक्यात कुऱ्हाड मारुन तुला येथेच गाडून टाकील आणि थडगे बांधिल, तुला केस करुन जेल मध्येच टाकते. अशी जिवे मारण्याची धमकी दिली. या घटने बाबत शिवाजी भानुदास कराळे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी राजश्री रविराज भिंगारदे, रा. डिग्रस, ता. राहुरी, हिच्यावर गुन्हा रजि. नं. १२१३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), १२६(२), ३२४(२), ३२९(३), ३५१(२), ३५२ प्रमाणे मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

पंचारती पात्र चोरून नेताना चोरटा सीसीटीव्हीत कैद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी :महादेव मंदीरात आरती करण्यासाठी ठेवलेले पंचारती पात्र एका चोरट्याने नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे घडली असून सदर घटना तेथील सीसीटिव्ही कॅमेर्यात कैद झाली. त्यानंतर केंदळ येथील एकावर गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे महादेवाचे सार्वजनिक मंदीर आहे. सदर मंदीरत सकाळी व संध्याकाळी गावकरी दर्शनाकरिता जातात. तसेच दररोज सांयकाळी ७ वाजता मंदीरामध्ये सर्व गावकरी देवाची आरती करतात. सदर आरती करण्यासाठी मंदीरामध्ये पितळी धातूची पंचारती ठेवलेली आहे. दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सांयकाळी ७ वाजता सर्व गावकऱ्यांनी मिळुन आरती केली. आणि आरतीचे पंचारती पात्र तेथेच ठेवले. त्यानंतर दि. १४ ऑक्टोबर रोजी सांयकाळी ७ वाजेच्या सुमारास पुन्हा सर्व गावकरी आरतीसाठी मंदीरमध्ये आले. तेव्हा आरती करण्यासाठीचे पंचारती पात्र गायब झाल्याचे दिसले. तेव्हा पंचारती पात्राचा मंदीरात आजुबाजुला शोध घेतला असता ते मिळुन आले नाही. मंदीरातील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता सदर सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी चोरी करताना दिसून आला. त्याने दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी ८ वाजता सदर पंचारती पात्र चोरून नेल्याचे दिसले.

या घटने बाबत सुरेश चंद्रभान हापसे, वय ४१ वर्षे, रा. ब्राम्हणी, ता. राहुरी, यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात आरोपी कैलास भिमराज हारदे, रा. केंदळ, ता. राहुरी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

निधनवार्ता

नारायण गायकवाड



वडाळा महादेव श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील प्रगतशील शेतकरी नारायण उर्फ कारभारी धोंडीबा गायकवाड (वय-९२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व दोन सुना. एक बहीण एक भाऊ व एक भावजयी व नातवंडे भाचे-भाच्या असा मोठा परिवार आहे.

दत्तात्रय जपे



शिर्डी : राहाता तालुक्यातील सावळविहीर बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी दत्तात्रय निवृत्ती जपे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, तीन भावजाई, तीन बहिणी, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, पुतणे, पुतण्या, सुना असा मोठा परिवार आहे. सावळविहीर ग्रामपंचायत सदस्य संजय ज्ञानेश्वर जपे यांचे ते चुलते होते.

ईपीएफ पेन्शनधारकांच्या प्रलंबित प्रश्नांवर खा. वाजे यांच्या उपस्थितीत बैठक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : नाशिक विभागातील कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी (ईपीएफ) पेन्शनधारकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर नाशिक येथील प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी कार्यालयात खासदार राजाभाऊ वाजे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी प्रादेशिक भविष्यनिर्वाह निधी आयुक्त (आरपीएफसी-१) कोटककर उपस्थित होते. बैठकीत पेन्शनधारकांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बंद पडलेले साखर कारखाने, खासगी उद्योग आणि विविध संस्थांमधील विस्थापित कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या थकीत भरण्याचा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. तसेच उच्च वेतनाच्या आधारे पेन्शन मिळण्यास पात्र असूनही अनेक कामगारांना त्यापासून वंचित राहावे लागत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. जिल्हा सहकारी बँका, वीज मंडळ आणि राज्य परिवहन महामंडळातील पात्र कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक प्रश्नांवरही चर्चा झाली.जळगाव जिल्हा सहकारी बँकेतील काही पेन्शनधारकांचे दावे नाशिक कार्यालयाकडून मंजूर करण्यात आले असून, त्यांना मागणी नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. काही पेन्शनधारकांना वाढीव पेन्शनही सुरू झाली आहे. लवकरच धुळे व नंदुरबार जिल्हा बँकांसह संबंधित संस्थांचे कामकाज सुरळीत होईल, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

विधवा पेन्शनचे दावे तातडीने मंजूर करावेत, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

या बैठकीस खा. राजाभाऊ वाजे यांच्यासमवेत पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोंखरकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष देवीसिंग अण्णा जाधव, अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष अण्णासाहेब म्हस्के, नाशिक जिल्हाध्यक्ष अरुण शेजवळ, संजय इनामके, विठ्ठलराव सोनवणे, जिल्हा सचिव पुंडलिक भामरे, सुरेश कटारिया आणि विठोबा मोरे उपस्थित होते.

घरी सोडण्याच्या बहाण्याने तरुणाला गाठले; हत्यारांनी हल्ला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : घरी सोडण्याच्या बहाण्याने सोबत नेऊन रस्त्यात चार ते पाच जणांनी एका तरुणाला अडवून बेदम मारहाण केल्याची घटना श्रीरामपूर शहरात घडली. मयूर फिंपाळे असे जखमी तरुणाचे नाव असून, ते शहरात सेतू केंद्र व यूट्यूब चैनल चालवतात. मिळालेल्या माहितीनुसार, सोनवणे नावाच्या ओळखीतील एका तरुणाने मयूर यांच्याकडे घरी सोडण्याची विनंती केली. त्यानुसार ते आशीर्वादनगरच्या दिशेने जात असताना अतिथी कॉलनीमार्गे गाडी नेण्यास सांगण्यात आले.

घराजवळ पोहोचण्यापूर्वीच चार ते पाच जणांनी त्यांची दुचाकी अडवली. यावेळी दुचाकीवरून आलेल्या एका तरुणाने वाद घालण्यास सुरुवात केली. हल्लेखोरांकडे हत्यारे असल्याचे सांगण्यात येत असून, सर्वांनी मिळून मयूर यांना बेदम मारहाण केली. जखमी मयूर यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रात्री उशिरापर्यंत पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवला नव्हता.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

बुधवार दि. ४ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त	सिंगल ५-१-९ मजबुत	
१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१-२०-४९

कल्याण

उदय-अस्त	सिंगल ९-४-५ मजबुत	
१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८-७५-२९

मुंबैम (मेन)

उदय-अस्त	सिंगल ४-७-९ मजबुत	
१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४-९७-१०

माधुरी बाजार डे / नाईट

१२४ ३६८ २४०	७-७६	२४० ३४९ ४५७	६३-७०-२०-३८-७७

७-६-५

dpbosssss.live

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	25 59 60 55 50	59 90 0 42 22 28	35 58 62 39 00	40 00 0 47 89 00	16 0 70 48 88
03/08/2026 to 07/08/2026	23 34 90 56 69	17 70 0 85 15 59	33 38 42 12 29	46 0 09 47 78	37 70 05 34 48
10/08/2026 to 14/08/2026	57 77 99 23 34	23 30 0 53 14 48	25 50 70 23 35	35 55 39 13 35	13 3 76 35 58
17/08/2026 to 21/08/2026	24 40 60 46 60	27 78 73 34 46	11 16 82 48 80	15 56 23 77 79	44 49 77 17 79
24/08/2026 to 28/08/2026	36 0 96 79 00	25 55 23 22 99	78 89 42 23 77	45 0 98 44 00	26 6 41 29 0
31/08/2026 to 04/09/2026	14 49 43 67 00	17 70 0 81 56 00	15 59 52 33 66	69 0 50 23 57	57 99 13 55
07/09/2026 to 11/09/2026	68 0 47 55 77	22 28 27 12 44	57 0 26 35 88	11 2 43 77 95	44 5 33 68 89
14/09/2026 to 18/09/2026	78 89 47 12 46	33 36 20 13 66	79 99 56 17 88	68 0 42 34 55	39 9 16 79 00
21/09/2026 to 25/09/2026	39 0 25 34 88	45 57 62 12 99	48 80 23 59 99	16 6 30 47 99	15 0 60 28 80
28/09/2026 to 02/10/2026	66 9 19 13 55	13 37 18 27 99	26 0 84 25 77	66 0 29 12 66	36 9 84 77 00
05/10/2026 to 09/10/2026	14 40 57 25 00	45 59 85 16 88	13 30 48 56 77	46 9 99 12 66	55 8 84 59 00
12/10/2026 to 16/10/2026	16 0 79 56 88	29 0 11 66 99	12 22 58 18 99	13 0 46 12 33	25 7 42 48 00

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
४७०	२४९
१७	५२
२७८	३३६

Mydpboss.com

स्कोडा ऑटो इंडियाने ओलांडला ३५० कस्टमर टचपॉइंट्सचा टप्पा, १९३ शहरांपर्यंत पोहोच वाढवली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : स्कोडा ऑटो इंडियाने आपले नेटवर्क १९३ शहरांमधील ३५० पेक्षा जास्त कस्टमर टचपॉइंट्सपर्यंत वाढवले आहे. यामुळे देशभरात ब्रँडची उत्पादने आणि मालकीचा अनुभव सहज मिळण्याची सोय अधिक भक्कम झाली आहे. ब्रँडने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी इंफाळमध्ये आपल्या ३५० व्या कस्टमर टचपॉइंटचे उद्घाटन करून ३५० टचपॉइंट्सचा टप्पा गाठला, आणि यासोबत मणिपूरमध्ये प्रवेश केला. स्थापित बाजारपेठा आणि नव्याने वाढणारे भाग, या दोन्हींमधील ग्राहकांच्या अधिक जवळ विक्री आणि आफ्टरसेल्स सेवा नेण्याची स्कोडा ऑटो इंडियाची बांधिलकी या विस्तारातून दिसून येते.

या टप्प्याबद्दल बोलताना स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, भारतात अधिक मजबूत स्कोडा ब्रँड घडवण्याचे आमचे ध्येय आमच्यासोबत वाटून घेतल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. नवीन



बाजारपेठांमध्ये प्रवेश करताना आमचे प्राधान्य स्पष्ट आहे – विक्री आणि आफ्टरसेल्स या दोन्हींमध्ये सातत्यपूर्ण आणि समृद्ध करणारा ग्राहक अनुभव देणे. आमचा वाढता प्रॉडक्ट पोर्टफोलिओ आणि ग्राहकांना प्राधान्य देणारे उपक्रम यांच्या जोडीने, हे वाढते नेटवर्क आम्हाला ग्राहकांचा विश्वास अधिक मजबूत करण्यास आणि देशभरात आमचे महत्त्व आणखी वाढवण्यास मदत करेल.

नवीन बाजारपेठांपर्यंत पोहोच, नवीन संधींची निर्मिती

स्कोडा ऑटो इंडियाची विस्तार रणनीती स्थापित महानगर बाजारपेठांच्या पलीकडील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यावर केंद्रित आहे. २०२६ मध्ये ब्रँडने ११ नवीन शहरांमध्ये प्रवेश केला: बालासोर, बारामती, भटिंडा, बिकानेर, गुना, इंफाळ, जोरहाट, कैथल, खम्मम, श्री गंगानगर आणि वसई. इंफाळमधील सुरुवात ही मणिपूरमध्ये एसएव्हीडब्ल्यूआयपीएल ग्रुपच्या एखाद्या ब्रँडची पहिलीच उपस्थिती आहे. तसेच, ईशान्य भागात ग्रुप ब्रँड्समध्ये स्कोडाची भौगोलिक व्याप्ती सर्वात जास्त आहे. जानेवारी ते ऑक्टोबर २०२६ या काळात ब्रँडच्या एकूण विक्रीत नवीन आउटलेट्सचा वाटा २५ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याने या विस्ताराचा व्यावसायिक परिणाम दिसून येतो.

ग्राहक अनुभव अधिक मजबूत करताना

नेटवर्क विस्तारासोबतच स्कोडा ऑटो इंडिया विक्री आणि आफ्टरसेल्स या दोन्हींमध्ये सातत्यपूर्ण ग्राहक अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. १६ शहरे, १८ ऑटोमोबाइल ब्रँड्स आणि ८८,००० ग्राहक रिव्ह्यूज यांचा समावेश असलेल्या सीएआरपीएचडी सर्व्हेमध्ये बंगळुरूमधील ब्रँडच्या डीलर पार्टनरने डीलरशिपमधील ग्राहक अनुभवात क्रमांक १ मिळवला.

चारा टंचाईवर हायड्रोपोनिक चारा निर्मितीचा प्रभावी पर्याय

कमी पाण्यात सात ते आठ दिवसांत पौष्टिक हिरवा चारा : डॉ. विठ्ठल विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

लोणी : दुष्काळी परिस्थितीत निर्माण होणारी चारा टंचाई दूर करण्यासाठी हायड्रोपोनिक पद्धतीने हिरवा चारा निर्मिती हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अत्यल्प पाण्यात आणि कमी जागेत अवघ्या सात ते आठ दिवसांत जनावरांसाठी पौष्टिक हिरवा चारा तयार करता येतो, अशी माहिती कृषी विज्ञान केंद्राच्या पशुसंवर्धन विभागाचे डॉ. विठ्ठल विखे यांनी दिली.

कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर (पायरेन्स) यांच्या वतीने 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत औरंगपूर येथे दुग्धव्यवसायिकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हायड्रोपोनिक पद्धतीने मका चारा निर्मिती आणि गव्हाच्या भुशावर युरिया प्रक्रिया करण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, सचिव तथा संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रशिक्षणात डॉ. विठ्ठल विखे यांनी हायड्रोपोनिक चारा निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली. चांगल्या प्रतीचे मका बियाणे निवडून ते सुमारे १२ तास पाण्यात भिजवावे. त्यानंतर ओल्या गोणपाटात ठेवून मोड आणावेत. हे बियाणे प्लास्टिकच्या ट्रेमध्ये पसरून रॅकवर ठेवावे. फॉगर किंवा तुषार सिंचनाद्वारे नियमित पाणी दिल्यास सात ते आठ दिवसांत २५ ते ३० सेंटीमीटर उंचीचा मुळांसह हिरवा चारा तयार होतो. हा चारा सुक्या चाऱ्यासोबत जनावरांना देता येतो.

याशिवाय निकृष्ट गव्हाच्या भुशावर युरिया आणि गुळाच्या साहाय्याने प्रक्रिया केल्यास त्याची पचनक्षमता व रुचकरता वाढण्यास मदत होते. उपलब्ध कोरड्या चाऱ्याचा योग्य वापर करून पशुखाद्यावरील खर्च कमी करण्याचे तंत्रही यावेळी सांगण्यात आले.

डॉ. विठ्ठल विखे म्हणाले, दुष्काळात चारा टंचाई ही दुग्धव्यवसायिकांसमोरील मोठी समस्या आहे. कमी पाण्यात आणि मर्यादित खर्चात दर्जेदार चारा उपलब्ध करून देण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त असून शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब करावा.

डॉ. उत्तमराव कदम यांनी सांगितले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र, पशुसंवर्धन विभाग आणि प्रवरा कृषी शास्त्र संस्थेच्या माध्यमातून दुष्काळी परिस्थितीत पाणी, चारा, फळबाग व पीक व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. दुष्काळाला न घाबरता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उपाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

द•ख•ल

आ. गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करा मागणीसाठी निवेदन



नेवासा : शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या बुलढाणा येथील आ. संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा रयत शेतकरी संघटनेच्या वतीने नेवासा पोलीस स्टेशनला निवेदन देऊन करण्यात आली आहे. सदर निवेदनाची दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी असे ही निवेदनात म्हटले आहे. नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की बुलढाना येथील आमदार संजय गायकवाड यांनी शेतकऱ्या विषयी काही अपशब्द वापरले आहे. सदरचे निवेदन सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार यांनी स्वीकारले. निवेदन देतेवेळी रयत शेतकरी संघटनेचे जिल्हा संपर्क प्रमुख खेडले काजळीचे सरपंच बाळासाहेब कोरडे पाटील,जिल्हाध्यक्ष बबनराव कोरडे,ओबीसी जिल्हाध्यक्ष गणेश सोनवणे, उत्तर जिल्हा प्रमुख विशाल वरकड,मारुती मुरदरे,तालुका सचिव अर्जुन वरखडे उपस्थित होते.

आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये आरोग्य जागरूकता व तपासणी उपक्रम

लोणी : निरोगी जीवनशैलीचा प्रसार व्हावा, नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि विविध आजारांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने पायरेन्स डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेदिक हॉस्पिटल व रिसर्च सेंटर, लोणी यांच्या वतीने नोव्हेंबर महिन्यात विशेष आरोग्य जागरूकता व तपासणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'आरोग्य दीपोत्सव नोव्हेंबर २०२६' या उपक्रमातून संधिवात, मधुमेह आणि उच्च रक्तदाब या आजारांविषयी जनजागृती केली जाणार आहे. या उपक्रमांतर्गत २ ते ८ नोव्हेंबरदरम्यान संधिवात जनजागृती सप्ताह, १३ ते १९ नोव्हेंबरदरम्यान मधुमेह जनजागृती सप्ताह, तर २१ ते ३० नोव्हेंबरदरम्यान उच्च रक्तदाब जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

झाडांच्या लोंबलेल्या फांद्यांमुळे चांगदेवनगर रस्त्यावर अपघात

पुणतांबा : चांगदेवनगर - पुणतांबा रसत्यावर कृषी विद्यालयाच्या अलिकडे मोठ्या झांडाच्या फांद्या वाढलेल्या असून त्या लोबंकल्यामुळे ह्या रसत्यावर छोटे अपघात होत आहेत कृषी विद्यालयाच्या अलिकडे रेल्वेच्या जुन्या केबीन जवळ दोन रस्ते आहेत एक रस्ता पुणतांबा रेल्वे स्टेशनकडे जातो तर एक रस्ता आशाकेंद्र चौकातून पुणतांबा स्टेशनरोड व बाजारपेठे कडे जातो रस्ता दुभाजकाच्या ठिकाणी व अलिकडे वाढलेल्या झाडांच्या फांद्या खाला आल्यामुळे येणाऱ्या व जाणाऱ्या वाहन चालकाला समोरून कोण येतात याचा अंदाज येत नाही. समोरून अचानक वाहनचालक आल्यास छोटे अपघात होत असून मोठे अपघात होण्याची शक्यता आहे. मागील आठवड्यात चांगदेवनगर येथील ज्ञानेश्वर नन्नावरे ही व्यक्ती वाहनाचा अंदाज न आल्यामुळे घसरून पडून जखमी झाले होते मुळातच आशाकेंद्र चौक ते चांगदेव नगर पर्यंत रस्ता अत्यंत अरुंद झालेला आहे त्यातच बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर फांद्या लोंबकल्या आहेत. तसेच जलशुद्धीकरण केंद्राजवळ अनेक खड्डे पडले आहेत. त्यामुळे ह्या मार्गावर ये-जा करतांना वाहन चालक व ग्रामस्थ अत्यंत त्रस्त झाले आहे.

आदर्श शाळेत बालचमुंनी पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनई : श्री हनुमान ग्रामीण विकास व संशोधन मंडळ पानसवाडी संचलित कै माजी खासदार तुकाराम जी पाटील गडाख संचलित आदर्श विद्यामंदिर माध्यमिक विभागामध्ये इयत्ता पाचवीच्या बाल चिमुकल्यांनी आपल्या स्वतःच्या कलाकुसरीतून,नवं नवीन कौशल्य वापरून अतिशय सुंदर व आकर्षक पर्यावरण पूरक आकाश कंदील बनवले. मुख्याध्यापक पवार एस.पी. यांच्या मार्गदर्शनातून चिमुकल्यांनी प्रेरणा घेऊन आकाश कंदील बनविले.

तसेच वर्गशिक्षिका श्रीमती आवटे आर. एच. यांनी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे याचे सुंदर प्रात्यक्षिक करून दाखविले व मार्गदर्शन केले. छोट्याशा चिमुकल्यांनी सुंदर मोहक कला कौशल्य विविध वस्तूंचा सजावटीसाठी उपयोग करून स्वतःच्या हाताने शाळेमध्ये सुंदर आकाश कंदील बनवले.

त्यातूनच तीन नंबर काढण्यात आले संस्थेचे सचिव श्री रविराज तुकाराम पाटील गडाख व अध्यक्षा सौ जयश्रीताई गडाख यांच्या हस्ते विजेते यांना सन्मानित केले.व विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले.

श्रीरामपूरच्या कन्यांची रिले स्पर्धेत सुवर्णभरारी विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : रयत शिक्षण संस्थेच्या स्व. सौ. एस. के. सोमय्या प्राथमिक विद्यामंदिर, श्रीरामपूर येथील विद्यार्थिनींनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत श्रीरामपूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुल, पिंपरी-चिंचवड येथे आयोजित १४ वर्षे खालील वयोगटामध्ये ४÷१०० मीटर रिले स्पर्धेत शाळेच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला.

स्वरा सुरुडे, वेदिका रोकडे, ऋतुजा रोकडे, अवंतिका गवारे आणि सेजल डोखे या खेळाडूंनी वेग, अचूक समन्वय, जिद्द आणि सांघिक भावनेच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. या विजयामुळे संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूंच्या या यशामागे त्यांचे नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेतील क्रीडापूरक वातावरण यांचा मोलाचा वाटा आहे. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या तथा रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन मीनाताई जगधने, मुख्याध्यापिका सोनाली पैठणे, क्रीडा विभागप्रमुख अमोल इधाते, प्रशिक्षक जालिंदर जाधव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

नदीपात्रात कोंबड्यांचे अवशेष टाकल्यास परवाने रद्द करू

मटण, चिकन विक्रेत्यांना पोलिसांची लेखी ताकीद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



बेलापूर : प्रवरा नदीपात्रात मृत कोंबड्यांचे अवशेष टाकल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. बेलापूर ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून बेलापूर पोलिसांनी गावातील २२ मटण व चिकन विक्रेत्यांची बैठक घेऊन त्यांना लेखी ताकीद दिली. यापुढे नदीपात्रात किंवा मानवी वस्तीजवळ मांसविक्रीतील अवशेष टाकल्यास कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला.

बेलापूर पोलीस चौकीत झालेल्या या बैठकीस बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, पत्रकार देविदास देसाई, पोलीस हवालदार मनोज गोसावी, गणेश भिंगारदे, बाळासाहेब कोळपे, पोलीस कर्मचारी संपत बडे यांच्यासह व्यावसायिक उपस्थित होते.

बैठकीत मटण, चिकन तसेच मासे विक्रीतून निघणारे अवशेष नदीपात्रात किंवा इतरत्र उघड्यावर टाकू नयेत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. संबंधित व्यावसायिकांच्या दुकानांच्या परवान्यांचीही तपासणी करण्यात येणार असून, नियमांचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द करण्यासह गुन्हा दाखल केला जाईल, अशी ताकीद देण्यात आली.

दरम्यान, अवशेषांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी व्यावसायिकांनी अभिषेक खंडागळे यांच्याकडे उपाययोजना करण्याची मागणी केली. यावर पत्रकार देविदास देसाई आणि चिकन व्यावसायिक हुसेन पठाण यांनी दोन दिवसांत याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. भविष्यात असा प्रकार पुन्हा घडू नये, यासाठी पोलिसांनी व्यावसायिकांना सक्त सूचना दिल्या.

ग्रामीण माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दाखविला स्वत:मधील कलाविष्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : शैक्षणिक क्षेत्रात उत्तम व दर्जेदार विद्यार्थी घडविणारे विद्यालय म्हणून टाकळीभान येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे ग्रामीण माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्यातील उपजत गुणांचा कलाविष्कार दाखवत दिवाळीच्या सणानिमित्त सुंदर व आकर्षक असे आकाश कंदील स्वतः तयार केले आहेत. इयत्ता पाचवी ते दहावीतील हे विद्यार्थी असून त्यांच्या कल्पक बुद्धीबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजेंद्र भांड सर , प्राचार्य औताडे, पत्रकार अर्जुन राऊत, व शिक्षक यांनी कौतुक केले.

शैक्षणिक ज्ञानग्रहणाबरोबरच इतर कल्पकतेला बद्धीला चालना देणाऱ्या या उपक्रमाबद्दल व सर्व या उपक्रमांमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे यावेळी उपस्थित पदाधिकारी, मान्यवरांच्या वतने अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी जावळे सर ,गुंड सर, गंधारे सर ,औताडे एस. बी. भगत सर, त्रिभुवन सर ,लोखंडे सर, भोगे सर, नाईक मामा ,मुठे मामा ,दाभाडे मामा निकम मामा आदीसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

बाल विद्या मंदिरमध्ये आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा उत्साहात : नगराध्यक्ष मोरे यांच्याकडून कौतुक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



राहुरी : वर्षातून सर्वात मोठा समजला जाणाऱ्या दीपावली सणाचे औचित्य साधून राहुरी येथील बाल विद्या मंदिर, या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विशेष 'आकाशकंदील निर्मिती कार्यशाळा' अत्यंत उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत इयत्ता दुसरी ते चौथीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आपल्या कल्पकतेने रंगीबेरंगी आणि आकर्षक आकाशकंदील साकारले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, हस्तकलेची आवड निर्माण व्हावी तसेच स्वतःच्या हाताने वस्तू तयार करण्याचा आनंद अनुभवता यावा, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कागद, काठ्या व विविध सजावट साहित्याचा सुरेख वापर करत सुंदर आकाशकंदील तयार केले.

कार्यक्रमादरम्यान राहुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी कार्यशाळेला सदिच्छा भेट दिली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कंदिलांचे त्यांनी विशेष कौतुक करून चिमुकल्यांना शाबासकी दिली.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना संदीप रासकर सर म्हणाले, सध्या दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन सर्वांनी अनावश्यक खर्च टाळून काटकसरीने दिवाळी साजरी करावी. तसेच फटाके वाजवताना दक्षता घेऊन पर्यावरणपूरक सण साजरा करावा आणि आपल्या समृद्ध संस्कृतीचे जतन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने मातीचे किल्ले बनवावेत.

शाळेचे मुख्याध्यापक गुलाब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. या उपक्रमासाठी अलका आढाव, सविता साखरे, नंदा काळे, सुनीता शेटे, जयश्री पाटोळे, मीना बर्डे, सुनीता बारसे, नानासाहेब पवार, बाळासाहेब राठोड आणि संदीप रासकर आदी शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारी ही कार्यशाळा पालक व नागरिकांमध्ये कौतुकाचा विषय ठरली आहे.

सडे फाट्यावर झाड कोसळल्याने पुणतांबा-कोपरगाव रस्त्यावर वाहतूक कोंडी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : पुणतांबा-कोपरगाव रस्त्यावरील सडे फाटा येथे मंगळवारी सकाळी मोठे झाड रस्त्यावर कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली. झाड रस्त्याच्या मधोमध पडल्यामुळे एसटी बससह मोठ्या वाहनांची वाहतूक ठप्प झाली होती. परिणामी, सुमारे साडेतीन ते चार तास वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सकाळी कोपरगावकडून येणाऱ्या बस वेळेत न आल्याने शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मोठे हाल झाले. या घटनेची माहिती मिळताच पत्रकार अजय जोशी यांनी आमदार विवेक कोल्हे यांचे स्वीय सहायक ऋषिकेश लोंढे व गणेश कोताडे यांच्याशी संपर्क साधून परिस्थिती निदर्शनास आणून दिली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देत सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्त्यावरील झाड हटविण्याच्या सूचना देण्याची कार्यवाही केली. तसेच आमदार आशुतोष काळे यांचे स्वीय सहायक दादासाहेब पठारे यांच्याशीही संपर्क साधण्यात आला. त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोपरगाव कार्यालयाशी संपर्क साधून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, आ. विवेक कोल्हे आणि आ. आशुतोष काळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वाहतूक पूर्ववत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर पडलेले झाड बाजूला केले. मंगळवारी सकाळी सव्वादहा वाजण्याच्या सुमारास पुणतांबा-कोपरगाव मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत झाली. मात्र, या घटनेमुळे सकाळच्या वेळेत प्रवासी आणि विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला.

पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून संस्कृती जपणाऱ्या मंडळांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)


नेवासा : गणेशोत्सव मिरवणुकीत डिजेचा वापर टाळून पारंपरिक वाद्यांच्या गजरात शिस्तबद्ध मिरवणूक काढणाऱ्या गणेश मंडळांचा गौरवचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. जनसेवक स्वर्गीय राजेंद्र मापारी व नगरसेविका स्व. सीमाताई राजेंद्र मापारी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. नगरसेवक स्वप्नील मापारी व ड. अनिकेत मापारी यांच्या पुढाकारातून या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिर देवस्थानच्या सभामंडपात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के शास्त्री, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार, डॉ. भाऊसाहेब घुले,बालेंद्र पोतदार, नगरसेवक संभाजी धोत्रे, जालिंदर गवळी,कार्यक्रमाचे संयोजक नगरसेवक स्वप्नील मापारी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.


कार्यक्रमाच्या प्रारंभी नगरसेवक स्वप्नील मापारी व ड. अनिकेत मापारी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. आपल्या वडिलांनी सुरू केलेली सन्मान सोहळ्याची परंपरा त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ यापुढेही अखंडितपणे सुरू ठेवणार असल्याची भावना मापारी बंधूंनी व्यक्त केली.यावेळी उपस्थित मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला, तर डिजेमुक्त आणि पारंपरिक वाद्यांच्या साथीने गणेशोत्सव मिरवणूक काढणाऱ्या या मंडळांना गौरवचिन्ह देऊन गौरविण्यात आले.या उपक्रमाचे महंत देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री व सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल पवार यांनी विशेष कौतुक केले.

याप्रसंगी देवस्थान जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे, किशोर सराफ, जयवंत मापारी, दीपक धोत्रे, संतोष कुंढारे, स्वानंद बडवे, आनंद दुधे, निखिल लष्करे, सिद्धार्थ सुखदान, संदेश शिरसाठ, रुद्र लष्करे, प्रकाश इरले, स्वप्नील इरले यांच्यासह तरुण मंडळाचे पदाधिकारी तसेच वैकुंठवाशी बन्सी महाराज तांबे वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नगरसेवक स्वप्नील मापारी यांनी आभार मानले.माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

'शिक्षकांना शिकवू द्या'च्या मागणीसाठी आज जिल्हा परिषदेवर जनता मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





श्रीरामपूर : शासकीय शाळांमधील शिक्षकांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असल्याचा आरोप करत 'शिक्षकांना शिकवू द्या' या प्रमुख मागणीसाठी आज (४ नोव्हेंबर) अहिल्यानगर जिल्हा परिषद कार्यालयावर जनता मोर्चा काढण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शिक्षक, पालक, विद्यार्थी संघटना, शिक्षण संस्थाचालक आणि शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक या मोर्चात सहभागी होणार असून, शिक्षकांच्या मागण्यांना समाजातूनही पाठिंबा मिळत आहे.

शिक्षकांचे मूळ काम विद्यार्थ्यांना शिकवणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे हे आहे. मात्र, बीएलओ, एसआयआर, जनगणना यांसारख्या प्रशासकीय जबाबदाऱ्यांसह विविध ऑनलाइन प, पोर्टल, गुगल फॉर्म, माहिती संकलन आणि अहवाल तयार करण्याच्या कामांमध्ये शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होत आहे. वारंवार तातडीने माहिती मागविणे, विविध शासकीय उपक्रमांची अंमलबजावणी आणि अनुदानाच्या खर्चाचा ऑनलाइन हिशोब यामुळे अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची शिक्षकांची तक्रार आहे.

शिक्षण आयुक्तांनी माहिती संकलनासाठी शनिवार निश्चित केला असतानाही स्थानिक पातळीवर शिक्षकांकडून सातत्याने माहिती मागविली जात असल्याचा आरोप आहे. एसएनएस स्पर्श प्रणालीद्वारे अनुदानाचा हिशोब सादर करताना मुख्याध्यापकांना अनेक प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देण्याची मागणीही करण्यात येत आहे. शिक्षकांच्या या समस्यांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत असल्याने पालकांमध्येही नाराजी आहे.

परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची वाहतूक करताना अधिकृत वाहनांची व्यवस्था नसल्याचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. अशा उपक्रमांसाठी सुरक्षित वाहतुकीचे धोरण निश्चित करण्याची मागणी होत आहे. शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करावी, समांतर कार्यक्रम लादू नयेत, अशैक्षणिक कामांचा भार कमी करावा तसेच शिक्षकांना मुख्यालयी राहण्याच्या अटीत शिथिलता देऊन ३० किलोमीटर अंतरावर राहण्याची मुभा द्यावी, अशा प्रमुख मागण्या मोर्चाद्वारे मांडण्यात येणार आहेत.

हा मोर्चा केवळ शिक्षकांच्या प्रश्नांसाठी नसून सार्वजनिक शिक्षणव्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या हक्कासाठी असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सर्व संघटनांच्या समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर इशारा नोटीशीने कळविणेस येते की,

मिळकतीचे वर्णनः- तुकडी जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी तालुका अहिल्यानगर पैकी मौजे अहिल्यानगर येथील सिटी सर्व्हे नंबर २७४१ यांसी भ्यु.घर नंबर २५८२ क्षेत्रफळ १४९.७० चौ.मि. यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे.

वरील मिळकत ही आमचे पक्षकार मनिषा विजय कोळपकर रा. भगवती को-हार, जि. अहील्यानगर यांचे वडीलोपार्जीत मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये प्रत्यक्षात कुठल्याही प्रकारे सरस निरस मानाने आमचे पक्षकाराचे वडील मुरलीधर बबनराव भांडेकर तसेच अशोक बबनराव भांडेकर, विजय बबनराव भांडेकर व चुलत भाऊ श्रीधर रामचंद्र भांडेकर व त्यांचे वारस यांचेमध्ये प्रत्यक्षात कुठल्याही प्रकारचे वाटप झालेले नाही. तसा कुठलाही लेख किंवा आपआपसात रजिष्ट्रर वाटप झालेले नाही. फक्त आपआपले सोईप्रमाणे ज्याने त्याने सिटी सर्व्हे ऑफिसर यांना हाताशी धरुन आपआपले नावे व क्षेत्र लावुन घेतलेले आहे ते सर्वस्वी चुकीचे आहे. तसेच सदर मिळकतीपैकी काही भाग निलेश संजय भांडेकर व निखील संजय भांडेकर यांनी आमचे पक्षकारास न विचारता कुठलीही संमती न घेता परस्पर विक्री करण्याचे बेतात आहे. तसेच त्यांनी यापुर्वी मिळकतीचा काही भाग विक्री केलेला दिसुन येत आहे. त्याबाबत आमचे पक्षकार स्वंतत्र फौजदारी कारवाई करणार आहे.

तरी मिळकतीबाबत कुठलेही प्रकारचे खरेदी विक्री करु नये, गहाण, बक्षीसपत्र अथवा कुठल्याही प्रकारे वरील मिळकतीचे विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करु नये, त्यास आमची हरकत आहे.

हि जाहीर नोटीस.
ठिकाण :- येवला
तारीख :-२/११/२०२६
नोटीस देणार
सौ मनिषा विजय कोळपकर

आमचे मार्फत प्रसिध्द
श्री. शैलेश श्रीहरी भावसार
ॲडव्होकेट, येवला कोर्ट
ता. येवला, जि. नाशिक
मोबा- ९८२२८२२२१२

जाहिर नोटीस

निशाणी नं. १
दिनांक:
नेमलेली तारीख :१८/१२/२०२६

ॲड. पी. डी. गर्जे
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे. ज्युडी. मॅजि. साहेब वर्ग १ यांचे कोर्टात
किरकोळ चौकशी अर्ज नं.२१९/२०२६

अर्जदार-वैशाली सुरेंद्र मोरे वय-२८, धंदा शेती, रा. मढी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर

सामनेवाले-निबंधक तथा ग्रामसेवक साहेब, ग्रामपंचायत देडगांव, ता. नेवासा जि. अहमदनगर

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. न्यायालयात जन्म अणि मृत्यु अधिनियम कायदा १९६९ चे कलम १३ (३) नुसार अर्ज अर्जदाराच्या जन्माची नोंद होऊन मिळणेसाठी दाखल केलेला असुन अर्जदार ही वरील ठिकाणचा रहिवाशी आहे. अर्जदाराची मुलगी ज्ञानेश्वरी सुरेंद्र मोरे हिचा जन्म दिनांक ०२/१०/२०२० रोजी मौजे देडगांव, ता. नेवासा येथे झाला आहे. अर्जदाराचे मुलीचा जन्म अर्जदाराच्या माहेरी मौजे देडगांव, ता. नेवासा येथे झालेला आहे. अर्जदाराच्या मुलीचा जन्म दवाखान्यात झालेला नाही. सदर ज्ञानेश्वरी सुरेंद्र मोरे याचे आईवडिलांनी तिचे जन्माची नोंद सा.वाला ग्रामपंचायतीकडे दिली होती. ज्ञानेश्वरी सुरेंद्र मोरे हिस शाळेत ॲडमिशन करावयाचे आहे त्यासाठी सदर दाखल्याची आवश्यकता आहे. परंतु सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म रजिस्टरला तिचे जन्माची नोंद नाही.

त्याबाबत अर्जदार याने ग्रामपंचायत देडगांव ता. नेवासा येथे जन्माच्या दाखल्याची मागणी केली मात्र ग्रामपंचायत देडगांव यांचे रेकॉर्डला ज्ञानेश्वरी सुरेंद्र मोरे हिचे जन्माची नोंद आढळून आली नाही व तसा दाखला त्यांना मिळाला नाही. ग्रामपंचायत देडगांव तसेच पंचायत समिती, तहसिलदार साहेब नेवासा यांचेकडे ज्ञानेश्वरी सुरेंद्र मोरे हिचे जन्माची नोंद आढळून आली नाही व त्यांनी जन्माचा दाखला देण्यास नकार दिला म्हणून त्याबाबतचा ग्रामपंचायत देडगांव यांनी जन्माची नोंद नसल्याचा दाखला अर्जदार यांना दि.१६/०९/२०२६ रोजी दिला. त्यामुळे अर्जदार यांना मे. कोर्टातुन जन्माचा दाखला मिळण्याबाबतचा आदेश व्हावा म्हणून सदरचा अर्ज मे. कोर्टात

त्या अर्थी सदरील वादासंबंधीत कोणाचेही काही एक म्हणणे किंवा कोणाची काही एक हरकत असेल तर या जाहिर नोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन एक महिण्याच्या आत दि. १८/१२/२०२६ पर्यंत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रांनिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
नेमलेली तारीख : १८/१२/२०२६

शिक्का

तयार करणार
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
नेवासा

हुकुमावरुन
सहा.अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क स्तर
नेवासा

पुस्तकातील धड्यांसोबत जीवनाचेही धडे!

हसत-खेळत शिक्षणातून घडतेय उद्याची सुजाण पिढी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकातील धडे, परीक्षा आणि गुणांची शर्यत नव्हे तर प्रत्यक्ष कृतीतून जीवनमूल्यांची रुजवणूकही होय. याच विचाराला कृतीची जोड देत जेऊर परिसरातील बेल्हेकर वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चिमुकल्यांनी आपल्या उपक्रमशीलतेतून इतर शाळांसमोर एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांना लहान वयातच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, वाचन, आरोग्य, शिस्त आणि सर्जनशीलतेची गोडी लागावी या उद्देशाने मुख्याध्यापक सचिन घुमरे आणि सहशिक्षिका अर्चना मकासरे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्यामुळे शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे व्यासपीठ बनली आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी पणत्या तयार करणे, त्यांना आकर्षक रंग देणे, आकाशकंदील बनविणे असे कलात्मक उपक्रम उत्साहात राबविले. या कृतीतून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळण्याबरोबरच सण-उत्सवांचा आनंदही द्विगुणित झाला.



शाळेतील उपक्रमांची व्याप्ती केवळ सण-उत्सवांपुरती मर्यादित नाही. 'रीडिंग बेल'मधून वाचनाची आवड, ई-कचरा व्यवस्थापनातून पर्यावरणाची जाणीव, हात धुवा दिनातून आरोग्याचे महत्त्व, प्लास्टिकमुक्त परिसरातून पर्यावरण संवर्धन, तर जंकफूड न खाण्याच्या उपक्रमातून सकस आहाराचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले जाते.

याशिवाय रांगोळी स्पर्धा, आनंददायी शनिवार, 'जो दिनांक तो पाढा' अशा उपक्रमांतून अभ्यासाची भीती दूर करून शिक्षण अधिक रंजक केले जात आहे.

ग्रामीण भागातील छोट्याशा शाळेने नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षणाचा आनंददायी पॅटर्न निर्माण केला आहे. शाळेतील चिमुकल्यांच्या या कृतीशील शिक्षणाचे पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून कौतुक होत असून बेल्हेकर वस्ती शाळेचा हा उपक्रम इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

घनकचरा विभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा सभासद हा संस्थेचा मुख्य घटक असून, सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने पतसंस्थेच्या वैद्यकीय मदत निधीतून आर्थिक सहाय्य केले जाते. अनेकदा आर्थिक परिस्थितीमुळे कर्मचारी आजारपणाकडे दुर्लक्ष करून आजार अंगावर काढतात. त्यामुळे त्यांच्या आजाराचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने पतसंस्थेच्या वतीने मदत केली जाते. याच उपक्रमांतर्गत सहा सभासदांना प्रत्येकी २५ हजार रुपयांप्रमाणे एकूण दीड लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना वैद्यकीय मदत निधीतून देण्यात येणाऱ्या धनादेशांचे वाटप चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. घनकचरा विभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगून मुदगल म्हणाले की, या विभागातील कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय मदत निधीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत. यावरून अनेक सफाई कर्मचारी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून नियमितपणे स्वच्छतेचे काम करत असल्याचे दिसून येते. आर्थिक अडचणींमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष होऊ नये आणि कर्मचाऱ्यांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पतसंस्था मदतीचा हात देत आहे.

घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.

विद्यार्थ्यांच्या माणुसकीच्या दिव्यांनी गरजूंची दिवाळी उजळली!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दीपावली म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि मांगल्याचा सण! मात्र समाजातील प्रत्येक घटकाला हा सण आनंदाने साजरा करता येतोच असे नाही. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरजू कुटुंबांना सणाच्या आनंदापासून वंचित राहावे लागते. अशा कुटुंबांच्या जीवनातही दीपावलीचा आनंद फुलावा, या उदात्त भावनेतून रयत शिक्षण संस्थेच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना दीपावलीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

दीपावलीच्या सणानिमित्त केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा न करता समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्याही जीवनात आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. त्यानुसार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या



मदतीने तसेच स्वतः पुढाकार घेऊन दीपावलीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वस्तू जमा केल्या. त्यानंतर शिक्षकांसमवेत विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर शहरातील डीएसपी चौक, स्टेट बँक चौक तसेच रेल्वे स्टेशन परिसरात जाऊन गरजू व वंचित नागरिकांना या साहित्याचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या या संवेदनशील कृतीमुळे अनेक गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधानाचे हास्य फुलले.

हा सामाजिक उपक्रम संस्थेच्या रितू दीदी बट यांच्या प्रेरणेने, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य इंजि. विजय बेरड यांच्या उपस्थितीत, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नारायण अनभुले यांच्या संकल्पनेतून उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राथमिक विभागातील सौ. प्रतिभा पाठक, सौ. मनिषा गवळी, श्रीम.भाग्यश्री धोंडे, सौ. ज्योती शेळके, श्रीम.रंजिता गलांडे आणि श्री. विजय कासार यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच माध्यमिक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती कविता शिंदे, प्रदीप पाडळे, श्रीम.क्रांती घायतडक आणि श्रीम. जयश्री मोरे यांनीही विद्यार्थ्यांसह प्रत्यक्ष उपस्थित राहून साहित्य वाटपाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ गरजू व्यक्तींना वस्तूंचे वाटप करण्याचा अनुभव मिळाला नाही, तर समाजातील वंचित घटकांच्या अडचणी समजून घेण्याची संधीही मिळाली. दुसऱ्यांच्या दुःखाची जाणीव ठेवणे, गरजूंच्या मदतीला धावून जाणे, सहकार्याची भावना जोपासणे आणि सामाजिक उत्तरदायित्व स्वीकारणे अशा महत्त्वपूर्ण मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये झाली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुस्तकी ज्ञानाबरोबरच सामाजिक आणि नैतिक मूल्यांचे संस्कार होणे आवश्यक आहे. याच विचारातून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना माणुसकीचा प्रत्यक्ष धडा देणारा ठरला. 'दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, हीच खऱ्या अर्थाने दीपावली!' हा माणुसकीचा सुंदर संदेश देत विश्वशंकर प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दीपावलीचा खरा साजरा केला.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगसाठी खेळाडूंवर लाखोंची बोली; २० लाखांपर्यंत लिलाव!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देत त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या सिझनसाठी खेळाडूंचा लिलाव नुकताच उत्साहात पार पडला. या लिलावात शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंवर संघमालकांनी लाखो रुपयांची बोली लावली. विशेष म्हणजे, काही खेळाडूंसाठी तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लागल्याने यंदाच्या स्पर्धेची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्थानिक खेळाडूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी,



त्यांच्यातील कौशल्याला प्रोत्साहन मिळावे आणि शहरात फुटबॉल संस्कृती अधिक बळकट व्हावी, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. यंदा या स्पर्धेचे पाचवे पर्व रंगणार आहे. शहरात नुकत्याच झालेल्या खेळाडू निवड व लिलाव प्रक्रियेत आठ संघांच्या मालकांनी सहभाग घेत आपल्या पसंतीच्या खेळाडूंना संघात स्थान देण्यासाठी चढाओढ केली. या लिलावाचे सूत्रसंचालन सनीत मुथा यांनी केले. विद्यादान सायन्स अकॅडमी, गुलमोहर स्पोर्ट्स क्लब, नवा मराठा न्यूज, डीइसी बेअरिंग, एमडी अँड आरडीएक्स, प्रॉप्स ऑरा आणि डॉक्टर बायो यांच्या वतीने खेळाडूंसाठी बोली लावण्यात आली.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा असे आठ संघ मैदानात उतरणार आहेत. या संघांमध्ये शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश असून, प्रत्येक संघाने आपली ताकद वाढविण्यासाठी गुणवंत खेळाडूंची निवड केली आहे.

लिलावामध्ये खेळाडूंवर एक लाख रुपयांपासून ते तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लावण्यात आली. आयुष गाडळकर, यदुवर कोकरे आणि भार्गव पिंपळे या खेळाडूंवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

माळीवाडा वेशीतील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम तातडीने सुरू करा!

अन्यथा १६ नोव्हेंबरपासून बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : माळीवाडा वेशीतील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे नियोजन असून, या कामात अतिक्रमणांमुळे अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवून पुतळे उभारणीचे काम सुरू करावे, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अतिक्रमणे न हटविल्यास १६ नोव्हेंबरपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

माळीवाडा वेशीमध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा अर्धाकृती पुतळा आहे. या पुतळ्याच्या अवतीभोवती मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. अहिल्यानगर शहराचे आमदार संग्रामभैय्या अरुणकाका जगताप यांच्या पुढाकाराने आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने या ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले



व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्यात येणार आहेत.

या पुतळ्यांच्या उभारणीचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्रामभैय्या अरुणकाका जगताप व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रविवार, दि. २७ जुलै २०२५ रोजी संपन्न झाले होते. मात्र, भूमिपूजन होऊनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माळीवाडा वेशीच्या परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविल्याशिवाय पूर्णाकृती पुतळे उभारणे आणि परिसराचे सुशोभीकरण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे महापालिकेने यापूर्वीही करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेऊन अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही तातडीने करावी. पुतळे उभारणीचे काम रखडू नये, यासाठी प्रशासनाने विलंब न करता आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

बनावट व्यक्तींच्या आधारे जमिनी हडपण्याचा धंदा तेजीत!

दुय्यम निबंधक कार्यालयातील गैरप्रकारांचे जाळे कोणाच्या आशीर्वादाने?

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा दुय्यम निबंधक कार्यालयात बनावट व्यक्ती उभ्या करून दुसऱ्यांच्या जमिनी परस्पर विक्री करण्याचे आणि जमिनी हडपण्याचे धक्कादायक प्रकार वारंवार समोर येत आहेत. या प्रकरणांमध्ये श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल झाले असून काही आरोपींना तुरुंगाची हवा खावी लागली आहे, तर काही संशयितांवरील कारवाईची टांगती तलवार कायम आहे. मात्र, एवढे गंभीर प्रकार उघड होऊनही या संपूर्ण गैरव्यवहारामागील मुख्य सूत्रधार कोण? ही टोळी नेमकी कोणाच्या आशीर्वादाने कार्यरत आहे? आणि या व्यवहारांमध्ये एजंटांची भूमिका किती मोठी आहे? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

एजंटांची साखळी तपासण्याची गरज; अनेक गुन्हे दाखल, काही तुरुंगात तर काही रडारवर!

विशेष म्हणजे, श्रीगोंदा तहसील कार्यालय आणि दुय्यम निबंधक कार्यालयाच्या परिसरात सक्रिय असलेल्या एजंटांच्या साखळीची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. जमिनीच्या व्यवहारासाठी येणारे पक्षकार खरे की बनावट, कागदपत्रांची पडताळणी नेमकी कशी होते, ओळख पटविण्याची प्रक्रिया कितपत काटेकोरपणे राबवली जाते, याची तपासणी होणे आवश्यक आहे. बनावट व्यक्ती उभी करून दस्त नोंदणी करण्याचे प्रकार घडत असतील, तर त्यामागे केवळ काही व्यक्तींचा सहभाग आहे की मोठे जाळे कार्यरत आहे, याचा शोध घेणे गरजेचे आहे.

आणखी धक्कादायक बाब म्हणजे, बनावट दस्तनोंदणीचे प्रकार उघडकीस आल्यानंतर काही व्यवहारांमध्ये रद्दलेख तयार करण्याचे प्रकारही समोर येत असल्याची चर्चा आहे. गुन्हा उघड झाल्यानंतर व्यवहार रद्द करण्याचा प्रयत्न करून जबाबदारी झटकण्याची प्रवृत्ती वाढत असेल, तर अशा प्रकारांना आळा कसा बसणार? गुन्हा उघड होईपर्यंत व्यवहार सुरळीत आणि पोलिसांच्या जाळ्यात अडकल्यानंतर मात्र एकमेकांकडे बोट दाखविण्याचा प्रकार सुरू असल्याचे चित्र आहे.

मूळ प्रश्न मात्र अनुत्तरितच! आतापर्यंत दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये केवळ बनावट व्यक्ती उभी करणाऱ्यांवर कारवाई करून चालणार नाही. बनावट कागदपत्रे तयार करणारे, व्यवहार जुळवून आणणारे, मध्यस्थी करणारे आणि अशा व्यवहारांना मदत करणाऱ्या प्रत्येक घटकाची चौकशी झाली पाहिजे. या संपूर्ण प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि त्यांना मदत करणारे चेहरे समोर येणे आवश्यक आहे.

बाहेरगावी राहणाऱ्या जमीनमालकांनो, सावधान!

श्रीगोंदा तालुक्यातील अनेक जमीनमालक नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कारणांमुळे बाहेरगावी वास्तव्यास आहेत. अशा जमीनमालकांनी आपल्या जमिनीच्या सातबारा उताऱ्याची, फेरफार नोंदींची आणि मालकी हक्काच्या कागदपत्रांची नियमित तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा आपल्या नकळत जमिनीच्या नोंदींमध्ये फेरफार होऊन किंवा बनावट व्यक्ती उभी करून जमीन विक्रीचा व्यवहार होण्याचा धोका नाकारता येत नाही. जमिनीचा मालक बाहेरगावी आणि जमिनीवर डोळा ठेवणारे गावात, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. प्रशासनाने या प्रकरणाची केवळ वरवरची चौकशी न करता संपूर्ण एजंट साखळी, दस्तनोंदणी प्रक्रिया आणि मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी विशेष तपास पथक नियुक्त करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दखल

माळीवाडा बसस्थानक ४ तारखेपासून तात्पुरते सुरु

नगर तालुका : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागाने शहरातील बस वाहतूक व्यवस्थेत तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६ पासून शहरातील माळीवाडा बस स्थानक तात्पुरते सुरु करण्यात आले असून माळीवाडा व स्वस्तिक बसस्थानकातून विविध मार्गांवरील एसटी बसेसची वाहतूक करण्यात येणार आहे. या नियोजनानुसार माळीवाडा बसस्थानकातून संगमनेर, पंढरपूर, सोलापूर, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, श्रीगोंदा, श्रीरामपूर, पारनेर तसेच तारकपूर आगाराच्या सर्व ग्रामीण फेऱ्यांची वाहतूक करण्यात येणार आहे. तर स्वस्तिक बसस्थानकातून जामखेड, तुळजापूर, बीड, पुणे, छत्रपती संभाजीनगर तसेच मराठवाड्यातील सर्व मार्गांवरील बसची वाहतूक केली जाणार आहे. दिवाळी हंगामात प्रवाशांची होणारी गर्दी आणि वाहतुकीचे नियोजन अधिक सुलभ व्हावे, यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती तारकपूर आगार व्यवस्थापक अभिजित चौधरी यांनी दिली आहे. प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन आपल्या इच्छित गावी जाण्यासाठी संबंधित बसस्थानकातूनच प्रवास करावा. तसेच एसटी महामंडळाच्या वाहतूक नियोजनास सहकार्य करावे, असे आवाहन रा. प. तारकपूर आगार प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरात पाडव्याला लग्न रेषा माहिती चित्रपटाचे ऑडिशन

नगर तालुका : मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव दूर करून मुलींच्या जन्माचे स्वागत व्हावे, स्त्रीभ्रूणहत्येला आळा बसावा आणि मुलींच्या शिक्षणाबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या सामाजिक उद्देशाने 'लग्न रेषा' या माहितीपटाची निर्मिती करण्यात येणार आहे. जय युवा अकॅडमी, क्शन फॉर वेल्फेअर डेव्हलपमेंट असोसिएशन आणि स्वप्नपूर्ती क्रिएशन मूव्ही कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक आशयाचा माहितीपट साकारण्यात येत आहे. या माहितीपटासाठी पाडव्याच्या मुहूर्तावर अर्थात ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून अहिल्यानगरमधील कल्याण रोड येथील जाधव लॉन्स येथे कलाकार निवडीसाठी ऑडिशन घेण्यात येणार आहे. अशी माहिती दिग्दर्शक तुषार रणनवरे, निर्माते प्रा. डॉ. रमेश वाघमारे आणि ड. महेश शिंदे यांनी दिली. समाजात आजही काही ठिकाणी मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव केला जात असल्याचे चित्र दिसून येते. विशेषतः काही कुटुंबांमध्ये मुलीच्या जन्माबाबत नकारात्मक मानसिकता असून, मुलगा-मुलगी समानतेचा विचार अद्याप सर्व स्तरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचलेला नाही. ही मानसिकता बदलण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नसून समाजाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. मुलींच्या जन्माचे आनंदाने स्वागत करणे, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे, महिलांचे आरोग्य जपणे आणि मुलींना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, या विषयांवर व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. इच्छुक कलाकारांनी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कल्याण रोड येथील जाधव लॉन्स, अहिल्यानगर येथे उपस्थित राहून ऑडिशन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

न्यायालयीन कागदपत्रे लपवून आरोपींना फायदा मिळवून देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर गुन्हा

नगर तालुका : अहिल्यानगरमधील तोफखाना पोलीस ठाण्यात एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला असून खाकी वर्दीला काळीमा फासणारी मोठी कारवाई करण्यात आली आहे. सरकारी नोकरीत असताना आणि निवृत्तीनंतरही जुन्या गंभीर गुन्ह्याचे मूळ दोषारोपपत्र व कागदपत्रे न्यायालयात दाखल न करता स्वतःजवळ ठेवून किंवा नष्ट करून आरोपींना मदत केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तथा फिर्यादी बालाजी मदनराव वैद्य यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये निवृत्त पोलीस हवालदार दगडू बाबाजी शेरकर रा. तराळवाडी पारनेर ता. पारनेर जि. अहिल्यानगर असे मुख्य आरोपीचे नाव असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी दगडू बाबाजी शेरकर हा तोफखाना पोलीस ठाण्यात कार्यरत असताना तोफखाना पोलीस ठाणे गु.र.नं. ४८१/२०१३ नुसार गुन्ह्याचे मूळ दोषारोपपत्र न्यायालयात जमा करण्याची जबाबदारी होती. गुन्ह्याचे दोषारोपपत्र व मूळ कागदपत्रे न्यायालयात सादर करून कोर्ट केस नंबर घेणे आणि फिर्यादीस न्याय मिळवून देणे हे त्या पोलीस कर्मचाऱ्याचे कायदेशीर कर्तव्याचा भाग होता. परंतु नमुद निवृत्त पोलीस हवालदार दगडू बाबाजी शेरकर यांनी गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध न्यायालयात पुरावा म्हणून हे कागदपत्रे वापरू नयेत म्हणून स्वतःजवळ बाळगले. गुन्ह्यातील आरोपींना कायदेशीर फायदेशीर ठरवून त्यांना शिक्षेपासून वाचविता यावे या एकमेव दुष्ट उद्देशाने आरोपीने सर्व शासकीय कागदपत्रे बेकायदेशीरपणे गायब केली आहेत. तोफखाना पोलीस ठाण्यात याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १९९, २४१ आणि २५५ नुसार गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई तीव्र करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाकडून आता याप्रकरणी कसून तपास सुरू आहे.

अल्पवयीन मुलासह वडिलांवर चाकू व दांडक्याने प्राणघातक हल्ला

नगर तालुका : भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत सीआयव्ही कॉलनी मुकुंदनगर व बेलेश्वर चौक परिसरात एका अल्पवयीन मुलावर आणि त्याच्या वडिलांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे.फिर्यादी मोहम्मद वसिम सय्यद (वय १७ वर्षे, रा. सर्जेपुरा, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार हा गंभीर प्रकार दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी घडला आहे.आरोपी आयान, समियान मो. शमी, इब्राहीम, आरहान इम्रान शेख आणि मो. शमी इमान (सर्व रा. मुकुंदनगर व झेंडीगेट, अहिल्यानगर) यांनी हा हल्ला केला आहे. आरोपी समियान मो. शमी याने फिर्यादीच्या वडिलांना मुख्याध्यापक पदावरून काढल्याचा जुना राग मनात धरून वाद घातला.आरोपींनी फिर्यादीला बडी मस्जिद जवळ अडवून लाकडी दांडक्याने डाव्या पायावर व डाव्या हातावर निर्घृण मारहाण केली.घटनेची माहिती मिळताच फिर्यादीचे वडील घटनास्थळी पोहोचले, त्यानंतर सर्वजण भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते.पोलीस ठाण्यातून वैद्यकीय उपचाराची चिठ्ठी घेऊन परत येत असताना बेलेश्वर चौक येथे आरोपींनी बर्गमन व पांढऱ्या रंगाच्या सुझुकी ॲक्सेस गाडीवर येऊन पुन्हा गाठले.आरोपी समियान मो. शमी याने तीक्ष्ण चाकूने फिर्यादीच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले व जीवे ठार मारण्याची धमकी दिली.या हल्ल्यात फिर्यादी मोहम्मद वसिम सय्यद आणि त्यांचे वडील वसिम गुलाम सय्यद दोघेही जखमी झाले असून त्यांना शहरातील हार्टबीट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

कर्जत तालुक्यात चार महिन्यांचा चारा नेमका कुठे?

सरकारी अहवालावर प्रश्नचिन्ह!

१३५ हजार जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई ३८ गावांत पेरणीच नाही, मग चारा उपलब्ध कसा? दिलीप कानगुडे यांची फेरसर्वेक्षणाची मागणी



ऋषभ परदेशी । राष्ट्र सह्याद्री

राशीन : कर्जत तालुक्यात दुष्काळाचे संकट गडद होत असताना पशुधनाच्या चारा उपलब्धतेचा प्रश्न गंभीर बनला आहे. तालुक्यात चार महिने पुरेल एवढा चारा उपलब्ध असल्याचा अहवाल पशुसंवर्धन व कृषी विभागाने शासनाला सादर केल्याचा दावा केला जात असताना, प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी असल्याचा आरोप दिलीप संभाजी कानगुडे यांनी केला आहे. तालुक्यातील ३८ गावांमध्ये पेरणीच झाली नसल्याने जनावरांसाठी चार महिने पुरेल एवढा चारा नेमका कुठून उपलब्ध झाला, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

कानगुडे यांच्या माहितीनुसार, कर्जत तालुक्यात उजनी लाभक्षेत्रातील १२, कुकडी लाभक्षेत्रातील २२ आणि सीना लाभक्षेत्रातील १२ अशा एकूण ४६ गावांचा समावेश आहे. मात्र, उर्वरित ३८ गावांमध्ये पेरणी झाली नसल्याने तेथील चारा उपलब्धतेबाबत त्यांनी शंका व्यक्त केली आहे. प्रत्यक्ष पाहणी न करता कागदोपत्री सर्वेक्षणाच्या आधारे अहवाल तयार केला आहे का, याची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

कर्जत तालुक्यात अंदाजे १ लाख ३५ हजार जनावरे असून, एका जनावराला दररोज सरासरी १२ किलो चारा गृहीत धरल्यास चार महिन्यांसाठी सुमारे १ लाख ९४ हजार ४०० टन चाऱ्याची आवश्यकता असल्याचा हिशोब कानगुडे यांनी मांडला आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध असल्याचा दावा करणाऱ्या संबंधित विभागाने चारा उत्पादन, पेरणी क्षेत्र आणि उपलब्ध साठ्याची प्रत्यक्ष आकडेवारी जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

उजनी लाभक्षेत्रातील गावांमध्ये सध्या ऊस उपलब्ध असला, तरी आगामी महिनाभर ते दीड महिन्यात हा ऊस कारखान्यांकडे गाळपासाठी जाण्याची शक्यता आहे. तसेच सीना नदीकाठच्या भागातील ऊसही सुकत असल्याने आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो, अशी भीती कानगुडे यांनी व्यक्त केली आहे.

चारा उपलब्धतेचा अहवाल कोणत्या आधारावर तयार करण्यात आला, किती क्षेत्रावर चारा पिकांची लागवड झाली आणि प्रत्यक्ष किती उत्पादन झाले, याची माहिती प्रशासनाने सार्वजनिक करावी. पशुसंवर्धन व कृषी विभागाने गावोगावी प्रत्यक्ष पाहणी करून चारा उपलब्धतेचे फेरसर्वेक्षण करावे, अशी मागणी दिलीप संभाजी कानगुडे यांनी केली आहे. चाऱ्याची उपलब्धता असल्याचा चुकीचा अहवाल शासनाकडे गेल्यास चारा छावण्या सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर पडू शकतो आणि शेतकऱ्यांच्या पशुधनावर उपासमारीचे संकट ओढवू शकते, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने तातडीने वस्तुस्थिती तपासून योग्य उपाययोजना कराव्यात; अन्यथा पशुधनाच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

आता प्रशासनाने कागदोपत्री आकडेवारीऐवजी प्रत्यक्ष चारा उपलब्धतेचे वास्तव समोर आणण्याची गरज आहे.

द•ख•ल

लता गवळी-फटांगडे यांची 'आयडॉल शिक्षक २०२६-२७' साठी निवड!



सुपा : शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले परिश्रम आणि अध्यापनातील योगदानाची दखल घेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ढोरजा (ता. श्रीगोंदा) येथील शिक्षिका मा. सौ. लता गुलाबराव गवळी-फटांगडे यांची 'आयडॉल शिक्षक २०२६-२७' या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे श्रीगोंदा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासोबतच त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देणे, शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करणे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य देणे, अशा कार्यातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या सन्मानामुळे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव झाला असून शिक्षकवर्ग, ग्रामस्थ, पालक आणि शिक्षणप्रेमींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. श्रुती सोनवणे यांना औषधनिर्माणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान



श्रीगोंदा : काष्टी येथील एचएसबीपीव्हीटी संचालित परिक्रमा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. श्रुती चंद्रकांत सोनवणे यांनी राजस्थानमधील सनराइज विद्यापीठ, अलवर येथून औषधनिर्माणशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे श्रीगोंदा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाची भर पडली आहे. दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांनी ही पदवी संपादन केली. विद्यापीठाच्या औषधनिर्माणशास्त्र विभागातील ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. बालाजी वाकुरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाचा विषय 'स्थानिक औषधी वनस्पतींचा त्वचारोगावरील औषधी उपयोग आणि त्यापासून औषधनिर्मिती' असा होता. या संशोधनातून स्थानिक औषधी वनस्पतींचे त्वचाविकारांवरील औषधी गुणधर्म, त्यांची उपयुक्तता आणि त्यावर आधारित औषधनिर्मितीचा अभ्यास करण्यात आला. अध्यापनाची जबाबदारी सांभाळत संशोधनाच्या क्षेत्रातही त्यांनी घेतलेली झेप विशेष कौतुकास्पद आहे. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमांच्या बळावर त्यांनी मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांसह तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय, सहकारी प्राध्यापक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत आबासाहेब काकडे विद्यालयाचे यश



शहरटाकळी : अहिल्यानगर जिल्हा मिक्स बॉक्सिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय मिक्स बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा राष्ट्रीय पाठशाळा, माळीवाडा येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यातील १५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये आबासाहेब काकडे विद्यालयातील कु.आदिती विघ्ने , कार्तिक मुटकुळे आरुषी भापकर यांना गोल्ड मेडल जिंकून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली, निवड झालेल्या खेळाडूंमध्ये से.मी .कॉन्टॅक्ट आणि फुल कॉन्टॅक्ट प्रकारातील सब ज्युनियर, ज्युनियर व सिनियर (मुले व मुली) गटातील खेळाडूंचा समावेश आहे. या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय पाठशाळेचे बोडखे सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष मा. श्री. नारायण संपत कराळे सर, उपाध्यक्ष मच्छिंद्र साळुंखे सर, सचिव हरी सानप सर, खजिनदार शशिकांत नवगिरे सर .आदी मान्यवर उपस्थित होते. पंच म्हणून ओमकार भंडारी सर ,कार्तिक काळे सर,सिद्धेश यादव सर ,व सुशांत मिसाळ सर यांनी काम पाहिले निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे सर, क्रीडा अधिकारी प्रवीण कोंडावळे , आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अँड.डॉ.शिवाजीराव काकडे साहेब,जिल्हा परिषद सदस्या सौ.हर्षदा काकडे, युवा नेते पृथ्वी भैया काकडे,मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मणराव बिटाळ यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अहिल्यानगर जिल्ह्यात ५२ हजार ६६० कामांचे नियोजन

नगर तालुका : अपुऱ्या पावसामुळे राज्य शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व १४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले असून, जिल्ह्यात एकूण ५२ हजार ६६० विविध विकासकामे शेल्फवर घेण्यात आली आहेत. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, हा या नियोजनाचा मुख्य उद्देश असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली व्ही.बी.जी. राम.जी. योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या चार प्रमुख प्रवर्गांतील कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत एकूण ३७५ प्रकारची विकासकामे मंजूर करता येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने जलसुरक्षा, मूलभूत ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविकेसाठी पायाभूत सुविधा तसेच आपत्ती निवारण व हवामान बदलाशी संबंधित कामांचा समावेश आहे. जलसंधारण, चारा निर्मिती, कृषी विभागामार्फत फळबाग लागवड, वृक्षलागवड, पाणंद रस्ते, घरकुल आणि सिंचन विहिरी यांसारख्या कामांमधून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. यामुळे पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यासोबतच ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. तसेच जलतारा प्रकल्पांतर्गत शेततळी, सिंचन विहिरी आदी जलसंधारण व सिंचनविषयक कामेही हाती घेण्यात येत आहेत. दुष्काळी परिस्थितीत रोजगारनिर्मिती, जलसुरक्षा, पशुधनासाठी चारा उपलब्धता आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास या बाबींवर जिल्हा प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. उपलब्ध कामांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मजुरांना रोजगाराची संधी मिळण्याबरोबरच गावांच्या विकासालाही चालना मिळणार आहे. त्यामुळे रोजगाराची आवश्यकता असलेल्या मजुरांनी ग्रामपंचायत स्तरावर कामाची मागणी नोंदवावी किंवा जिल्हास्तरीय मदत कक्षाच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

जिल्हा बँकेच्या नूतन संचालक ज्योती शिंदे यांची कर्जतमध्ये विजयी मिरवणूक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



कर्जत : सेवा सोसायटी मतदारसंघातून विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थक ज्योती प्रकाश शिंदे यांनी दणदणीत विजय मिळवला. ज्योती शिंदे यांना ५४ मते मिळाली तर विरोधक तुषार पिसाळ यांना अवघे २० च मतदानावर समाधान मानावे लागले. ज्योती शिंदे यांची कर्जत भाजपाच्यावतीने शहरात विजयी मिरवणुक काढण्यात आली. यावेळी समर्थकांनी जल्लोष करीत एका निष्ठावंत कार्यकर्त्यांस राम शिंदेंनी संधी दिल्याचे आभार मानले. नूतन संचालक ज्योती शिंदे यांनी मिरवणुकीने जात ग्रामदैवत संत सदगुरु गोदड महाराज यांचे आशीर्वाद घेतले.

अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या निवडणूक जाहीर झाल्यापासून कर्जत मतदारसंघ संवेदनशील म्हणून गणला गेला. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी प्रथमताच यंदाच्या निवडणुकीत वैयक्तिक लक्ष घालत ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघातून त्यांनी ज्योती प्रकाश शिंदे यांना उमेदवारी देत मागील १० वर्षांपासून संचालक असणारे विखे समर्थक अंबादास पिसाळ यांच्या पुत्रास जाहीरपणे आव्हान दिले होते.

पहिल्या दिवसापासूनच राम शिंदेंनी पिसाळ यांना चक्रव्यूहात घेरत मतदार असणाऱ्या ठरावधारकांना राज्याबाहेर सहलीसाठी रवाना केले होते. सोमवारी थेट मतदान केंद्रावर आणत नियोजनबद्ध मतदान करून घेतले. मंगळवारी झालेल्या मतमोजणीत ज्योती शिंदे यांनी ५४ मते घेत तुषार पिसाळांचा ३४ मतांनी पराभव केला. तुषार पिसाळ यांना अवघे २० मते पडली. तर एक मतदान बाद झाले. ज्योती शिंदे यांच्या विजयाची घोषणा होताच राम शिंदे समर्थकांनी कर्जतमध्ये जल्लोष केला. दुपारी ३ वाजता शहरातून कर्जत भाजपच्यावतीने डीजेच्या दणदणाटात गुलाल उधळत उघड्या जीपमधून मिरवणूक काढण्यात आली.

नगरमधील तोफखाना परिसरात पूर्ववैमनस्यातून वेल्डरवर जीवघेणा हल्ला; कोयत्याने बोट तोडले!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत सनसनाटी निर्माण करणारी थरारक मारहाणीची घटना उघडकीस आली असून फिर्यादी सचिन राजाराम साठे (वय ३८ वर्षे, व्यवसाय वेल्डिंग, रा. सिद्धार्थनगर, अहिल्यानगर) हे आपल्या मोटारसायकलवरून जात असताना सिद्धार्थनगर चौक, गौतम अपारमेंट जवळ हा गंभीर प्रकार घडल्याची नोंद करण्यात आली आहे. सुडकेमळा कमानीजवळ झालेल्या आधीच्या किरकोळ शिवीगाळ व वादाच्या कारणावरून आरोपी १) सचिन कृष्णकांत शेलार, २) अभि राहुल शेलार, ३) रुपेश कृष्णकांत शेलार, ४) सागर रावसाहेब ठोकळ आणि ५) निखिल गायकवाड सर्व रा. सिद्धार्थनगर यांनी हा कट रचून फिर्यादीस अचानक अडवले आणि जीवघेणा हल्ला केला. यादरम्यान आरोपी सचिन कृष्णकांत शेलार आणि अभि राहुल शेलार यांनी फिर्यादीच्या डाव्या हातावर लोखंडी धारदार कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले, तर अभि शेलार याने फिर्यादीच्या पायाच्या पोटरीवर सुद्धा कोयत्याने वार करून रक्तबंबाळ केले. त्यानंतर आरोपी रुपेश कृष्णकांत शेलार आणि सागर रावसाहेब ठोकळ यांनी लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या कंबरेवर बेदम मारहाण केली आणि पाचवा आरोपी निखिल गायकवाड याने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या भीषण हल्ल्यामध्ये फिर्यादीच्या डाव्या हाताचे एक बोट पूर्णपणे तुटून बाजूला पडले असून, दुसरे बोट गंभीर जखमी झाल्याने बांधून ठेवावे लागले आहे.

मारहाणीदरम्यान आरोपींनी फिर्यादीला दमदाटी करत 'येथे राहायचे असेल तर आमच्या नादी लागायचे नाही' अशी उघड धमकी दिली. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळ वैद्य आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप एकशिंगे यांनी घटनास्थळाला भेट दिली असून, तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये गुन्हा रजि नंबर ९०१/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या गंभीर जखमी झालेल्या फिर्यादीवर सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे वैद्यकीय उपचार सुरू असून पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

दुष्काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही

आदित्य ठाकरे ४ नोव्हेंबरला अहिल्यानगर दौऱ्यावर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : दुष्काळाच्या संकटाने शेतकरी पुरता हवालदिल झाला असताना केवळ आश्वासनांची खैरात करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या मदतीला प्रत्यक्ष धावून जाण्याचा निर्णय शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने घेतला आहे. काबाडकष्ट करून शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळालाच पाहिजे, अशी भूमिका घेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार राज्यभर शेतकरी मदत केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. याच उपक्रमाचा भाग म्हणून अहिल्यानगर जिल्ह्यातही शेतकरी मदत केंद्रे उभारण्यात येणार असून, ४ नोव्हेंबर रोजी शिवसेना नेते तथा युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते नेवासा तालुक्यातील कुकाणा आणि पारनेर येथे या केंद्रांचे उद्घाटन होणार आहे. यावेळी आदित्य ठाकरे शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी आणि रामदास गोल्हार यांनी ही माहिती दिली.

जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले आहे. पिके हातची गेली, रब्बी हंगामाची चिंता सतावत आहे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे, तर अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. एकीकडे शेती उत्पादनात घट, दुसरीकडे वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि बाजारभावातील अनिश्चितता अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. सरकारी मदतीच्या घोषणा होत असल्या तरी प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी पडणार, हा प्रश्न कायम आहे. पंचनामे, निकष आणि प्रशासकीय प्रक्रियांच्या चक्रात शेतकऱ्यांना अडकवून ठेवण्याऐवजी त्यांना तातडीने दिलासा मिळणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे, त्यांच्या समस्या काय आहेत आणि प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना होणे गरजेचे आहे, यासाठी जिल्ह्यात शेतकरी मदत केंद्रांच्या माध्यमातून मदतीची यंत्रणा उभी केली जाणार आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारी, नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि शासकीय मदतीसंदर्भातील अडचणी समजून घेऊन त्यांचा पाठपुरावा करण्यावर या केंद्रांचा भर राहणार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी केवळ निवेदने देऊन थांबायचे नाही, तर त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरायचे, असा पक्षाचा निर्धार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ४ नोव्हेंबर रोजी आदित्य ठाकरे दुपारी १२ वाजता नेवासा येथे दाखल होतील. त्यानंतर कुकाणा येथे शेतकरी मदत केंद्राचे उद्घाटन करून ते शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्याचाही त्यांच्या दौऱ्यात समावेश आहे.

'सार्थक दीपावली' उपक्रमातून सात विद्यार्थ्यांना गणवेश



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा उत्सव नव्हे तर दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश पेरण्याचा सण. याच भावनेतून जेऊर बा. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने 'सार्थक दीपावली – चला आनंद वाटू या' हा अनोखा उपक्रम राबवत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीने स्वेच्छेने एका बरणीत निधी जमा केला. चिमुकल्यांनी देखील आपल्या परीने या उपक्रमात खारीचा वाटा उचलला. जमा झालेल्या निधीतून शाळेतील सात एकल माता व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना स्पोर्ट्स ड्रेसचे वाटप करण्यात आले. शिक्षण विस्तार अधिकारी संजय बोबडे व केंद्रप्रमुख नितीन दळवी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ड्रेसचे वाटप करण्यात आले. ऐन दीपावलीच्या सणात नवीन ड्रेस मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. मुख्याध्यापक मधुकर डहाळे व सर्व शिक्षकांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला.

पणतीने पणती पेटवू या, जीवन अंधकार प्रकाश मय करूया

अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री



पाथर्डी : स्वतःच्या जीवनातील दुःख, भावनिक कोरडेपणा बाजूला ठेवून इतरांच्या जीवनामध्ये आनंदाचे क्षण निर्माण करण्यासाठी येथील निवासी मतिमंद विद्यालय व मतिमंद मुलांचे बालगृहामधील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी लहान मोठे आकाश कंदील, मेणाच्या पणत्या, आकर्षक लक्ष्मी मूर्ती व अन्य सजावट साहित्य शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली बनवले आहे. या उपक्रमामुळे अंधारात चाचपडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनातही जगण्याचा नवा प्रकाश आत्मविश्वासाच्या रूपाने निर्माण होत आहे.

शहरापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर निवासी मतिमंद विद्यालय आहे. गेल्या बारा वर्षांपासून या विद्यालयाचे विद्यार्थी दिवाळीसाठी स्वतःच्या हाताने सजावटीचे साहित्य तयार करतात. दीपोत्सवासाठी आकाश कंदील, विविध प्रकारच्या पणत्या, सजावट साहित्य, सुमारे दोन महिन्यांपासून परिश्रम तयार करतात. अत्यंत आकर्षक असे पॅकिंग त्यासाठी करण्यात येते. या विद्यार्थ्यांनी निर्माण केलेल्या आकाश कंदीलाला ग्राहकाची चांगली पसंती मिळते. यासाठी लागणारा कच्चामाल पुण्यावरून आणला जातो.

विद्यालयातील विषय शिक्षक व कलाशिक्षक हेच यांचे विश्व बनल्याने तुम्हीच आमचे मायबापअशा भावनेने विद्यार्थी येथे जीवन जगतात. ईश्वराने प्राण दिला, पण त्यासाठी धडधाकट शरीर व विचार करणारा मेंदू मात्र कमकुवत ठेवला. या गोष्टीवर रडत बसण्यापेक्षा जीवन आनंद मिळवण्याच्या अनेक वाटा शिक्षक व संस्थाचालकांच्या संयुक्त प्रयत्नाने येथे शोधल्या जातात. शहरातील बहुतेक नागरिक वैयक्तिक आनंदाच्या प्रसंगी अथवा सणावाराच्या दिवशी येथील विद्यार्थ्यांना मीष्ठांना भोजन देतात. काही जणांकडून नाश्ता दिला जातो.

त्यावेळी शहरातून येणाऱ्या नागरिकांनी पासून काहीसे बाजूला जात ही सर्व मुले एकमेकात राहतात. शहाण्या माणसांपासून स्वतःला दूर ठेवतात. प्रत्येकाला काहीतरी व्यंग आहे, मात्र त्यावर मात करत ती व्यक्ती आपल्याकडे बघून ज्यावेळी हसते, त्यावेळी आपण अंतर्मुख होतो. ईश्वराने आपल्याला सर्व काही दिले आहे, तरीही जीवनासक्ती सुटत नसल्याने खरे मतिमंद आपण ठरतो. जो मती मंद आहे, तो तर जगण्याची धडपड करतो आहे. ईश्वराला दोष देत नाही. नशिबाला दोष देत नाही, आले जीवन वाट्याला, नाही आनंदा तोट्याला, या उक्तीप्रमाणे प्रमाणे जगून वर करणी चांगल्या वाटणाऱ्या माणसांचा आदर्श बनत आहे. दिवाळीचा सण आनंदाचा, मांगल्याचा, पावित्र्याचा व सहवासातील प्रत्येकाच्या जीवनामध्ये आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा म्हणून ओळखला जातो. धावपळीच्या जीवनामध्ये माणूस आत्मकेंद्री झाला.

सभोवतालच्या वातावरणाचा त्याला विसर पडला. भोगवादी प्रवृत्तीमुळे परोपकारी प्रवृत्ती लोप पाऊन माणुसकीचा झरा आटला. या सर्वांवर मात करत मतिमंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चार दोन रुपये कमावण्यासाठी असा उपक्रम हाती घेतला असे म्हणण्यापेक्षा आपल्यामध्ये कुठल्याच प्रकारची उणीव नाही,

विद्यार्थ्यांनी मोठे आकाश कंदील ६००, मेणाच्या पणत्या २५० पॉकेट, आकर्षक लक्ष्मी मूर्ती १००, छोटे आकाश कंदील पाचशे पॉकेट, अन्य सजावट साहित्य बनवले आहे संस्थेच्या अध्यक्ष अनिता निराळी, मुख्याध्यापक सचिन तरवडे व्यवस्थापक प्रताप निराळी अधीक्षक संभाजी झावरे, प्रभारी मुख्याध्यापक नितेश मेघनर, व सर्व कर्मचारी या कामांमध्ये विद्यार्थ्यांना मदत करतात. दिवाळी दरम्यान शहरातील मराठी मुलांच्या शाळेत पुढे या विद्यालयाचे विक्री केंद्र असते. अहिल्यानगर येथील काही सेवाभावी व सामाजिक संस्था या विद्यालयाकडून जाणीवपूर्वक दिवाळीसाठी साहित्य खरेदी करतात.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.०४ नोव्हेंबर २०२६ । पान ८

शिर्डीच्या प्रथम महिला नगराध्यक्षा सुमित्रा (काकी) कोते पाटील अनंतात विलीन

हजारोंच्या जनसमुदायाच्या साक्षीने साश्रू नयनांनी अखेरचा निरोप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शिर्डी नगरपंचायतीच्या प्रथम लोकनियुक्त महिला नगराध्यक्षा आणि सामाजिक कार्यात अग्रणी असलेल्या सुमित्रा (काकी) कैलास बापू कोते पाटील यांच्या निधनाने शिर्डी शहरासह पंचक्रोशीत शोककळा पसरली आहे. अल्पशा आजाराने त्यांची प्राणज्योत मालवली. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत साई आश्रम क्रमांक एकच्या मागील प्रांगणात अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पुत्र योगीराज आणि धनराज यांनी मातेला अग्नी दिला. यावेळी उपस्थित जनसमुदायाला अश्रू अनावर झाले. अंतिम दर्शनासाठी सकाळपासूनच कैलास बापू कोते यांच्या निवासस्थानी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच राहाता, संगमनेर, कोपरगाव आणि परिसरातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रांतील मान्यवरांसह महिला व नागरिकांनी त्यांचे अंतिम दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली.

सुमित्रा काकी यांचे संपूर्ण जीवन सामाजिक बांधिलकीचे उदाहरण होते. स्वतःच्या घरात मुलगी नसल्याची खंत बाजूला ठेवून त्यांनी समाजातील मुलींना आपले मानले. सामुदायिक विवाह सोहळ्यांच्या माध्यमातून अडीच हजारांहून अधिक गरीब व गरजू मुला-मुलींचे विवाह लावून देत त्यांचे संसार उभे केले. त्यामुळे अनेक गरीब कुटुंबांसाठी त्या मायेचा आधार बनल्या होत्या.

शिर्डीच्या नगराध्यक्षा म्हणून सलग दोन वेळा त्यांनी शहराचे नेतृत्व केले. त्यांच्या कार्यकाळात शहराच्या विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी विविध विकासकामे मार्गी लावली. श्री साईबाबा संस्थानच्या विश्वस्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. साईभक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच परिसरातील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

अंत्यसंस्कारप्रसंगी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, संगमनेरच्या माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे, भाजप नेते डॉ. राजेंद्र पिपाडा, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात, राहाता नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष अभय शेळके, डॉ. धनंजय धनवटे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक आणि हजारो नागरिक उपस्थित होते. सुमित्रा काकींच्या निधनाने शिर्डीने एक सामाजिक जाणिवेचे नेतृत्व आणि अनेक कुटुंबांना आधार देणारे मातृतुल्य व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

मान्यवरांकडून भावपूर्ण श्रद्धांजली

डॉ. सुजय विखे पाटील : काकींना चांगले आयुष्य मिळावे यासाठी कोते कुटुंबाने गेल्या काही महिन्यांत अथक प्रयत्न केले. त्यांच्या निधनाने मनाला वेदना झाल्या असून विखे पाटील परिवाराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

अण्णासाहेब म्हस्के : शिर्डीच्या विकासाचा पाया त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात रोवला गेला. प्रत्येकाचे आदरातिथ्य आणि स्वागत करण्यात त्यांचा हातखंडा होता. परिसरात त्यांनी मायेची वेगळी ऊब निर्माण केली होती.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे : नगराध्यक्षपद, संस्थानचे विश्वस्तपद आणि सामाजिक कार्यक्रमांमधील त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील. त्यांचे अकाली जाणे मनाला चटका लावणारे आहे.

अभय शेळके : काकी नगराध्यक्षा असताना त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. बापूंच्या डोळ्यांत कधी अश्रू पाहिले नव्हते; मात्र आज त्यांचे दुःख पाहून मन हेलावले.

दुर्गाताई तांबे : सुमित्रा वहिनींनी शिर्डीचे उत्तम नेतृत्व केले. सामुदायिक विवाह सोहळ्यांत पुढाकार घेत कन्यादान करत त्यांनी समाजसेवेचे व्रत जोपासले.

डॉ. राजेंद्र पिपाडा : त्यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे. कोते कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती साईबाबांनी द्यावी, अशी प्रार्थना करतो.

विवाहित महिलेला काठीने मारहाण, बाप लेकावर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी तालुक्यातील मानोरी येथे घरगुती वादातून विवाहित महिलेला तिच्या पती व सासऱ्याने काठीने मारहाण केल्याची घटना दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री घडली. मुलीला सोडवण्यासाठी गेलेल्या तिच्या आई वडिलांनाही धक्काबुक्की व मारहाण करण्यात आली. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या महिलेला उपचारासाठी अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

याबाबत पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, रंगनाथ सोमाजी कानडे, वय ६६ वर्षे, रा. शिरेगाव, ता. नेवासा, यांची मुलगी कावेरी अभिजीत बाचकर ही मानोरी गणपतवाडी रोड येथे पती अभिजीत गंगाधर बाचकर व सासू- सासऱ्यां सोबत राहते.

दि. ३० ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास कावेरी हिने वडिलांना फोन करून पती दारू पिऊन घरी आला असून पती व सासू-सासरे मला भांडण करून मारहाण करत असल्याचे सांगितले. तसेच तातडीने घरी येण्याची विनंती केली. त्यानंतर रंगनाथ कानडे व त्यांची पत्नी शांता हे मोटारसायकलवरून रात्री सुमारे ९.०५ वाजता मुलीच्या घरी पोहोचले.

त्यावेळी मुलगी कावेरी हिला तीचा पती व सासरा शिवीगाळ करून मारहाण करत होते. याबाबत जाब विचारला असता दोघांनी काठ्यांनी कावेरीच्या दोन्ही हातांवर, पायांवर व पाठीवर मारहाण केली. दरम्यान मुलीला सोडवण्यासाठी गेलेल्या तीच्या आई वडीलांना आरोपींनी शिवीगाळ, दमदाटी करून काठी व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

घटनेनंतर रंगनाथ सोमाजी कानडे यांनी राहुरी पोलीस स्टेशन गाठले. त्यांच्या फिर्यादीनुसार आरोपी अभिजीत गंगाधर बाचकर व गंगाधर विश्वनाथ बाचकर, दोघे रा. मानोरी, ता. राहुरी यांच्या विरुद्ध गुन्हा रजिस्टर नं. १२१४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११५(२), ११८(१), ३(५), ३५१(२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहे.

जेलमधून सुटकेनंतर प्रकाश लोंढे यांच्याकडे पुन्हा आरपीआयच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नाशिक : गेल्या वर्षी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाल्याने जेलमध्ये असलेले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते प्रकाश लोंढे हे जामिनावर सुटका झाल्यानंतर पुन्हा पक्षात सक्रिय झाले आहेत. त्यांच्याकडे पुन्हा एकदा जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांनी याबाबत अधिकृत पत्र काढून लोंढे यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवत जिल्हाध्यक्ष पदासोबतच उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष पदाची अतिरिक्त जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आली आहे.



गेल्या वर्षी नाशिकमध्ये त्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते आणि त्यानंतर ते न्यायालयीन कोठडीत होते. दीर्घ काळापासून ते जेलमध्ये असल्याने पक्षाच्या जिल्ह्यातील संघटनात्मक कामावर काहीसा परिणाम झाला होता. मात्र आता न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केल्याने आणि जेलमधून सुटका झाल्याने ते पुन्हा पक्षाच्या कार्यात सक्रीय होणार आहेत.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी त्यांना दिलेल्या पत्रात संघटना मजबूत करण्यासाठी काम करण्याच्या सूचना दिल्या असून आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची बांधणी करण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. उत्तर महाराष्ट्राच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाल्याने त्यांच्या कार्यक्षेत्रात वाढ झाली असून जिल्ह्याबरोबरच संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात पक्ष संघटन वाढवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल.

जेलमधून बाहेर आल्यानंतर पुन्हा त्यांना थेट जिल्हाध्यक्ष आणि उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष असे दोन महत्त्वाचे पद देण्यात आल्याने पक्षातील त्यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बिंगो जुगाराचा धुमाकूळ!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शनिशिंगणापूर : नेवासा तालुक्यातील श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बिंगो जुगाराने डोके वर काढल्याची चर्चा सुरू आहे. परिसरातील गावांमध्ये खुलेआम जुगाराचे अड्डे सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. विशेष म्हणजे, एकाच गावात चार ठिकाणी बिंगो जुगार सुरू असल्याचा दावा होत असून, यावर ठोस कारवाई होत नसल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही गावांमध्ये बिंगो जुगाराचे जाळे विस्तारत असून, ग्रामीण भागातील तरुण आणि कामगारवर्ग या प्रकाराकडे आकर्षित होत आहे. कष्टाने कमावलेला पैसा जुगारात गमावला जात असल्याने अनेक कुटुंबांसमोर आर्थिक संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. आधीच आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी हा प्रकार चिंतेचा विषय बनला आहे.



विशेष म्हणजे, संबंधित जुगार अड्ड्यांवर कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याची तक्रार नागरिक करीत आहेत. जुगाराचे अड्डे सुरू असल्याची माहिती पोलिसांना नाही का? माहिती असूनही कारवाई का होत नाही? या अड्ड्यांना कोणाचे अभय आहे? असे सवाल उपस्थित केले जात आहेत. मात्र, नागरिकांनी केलेल्या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कथित जुगार अड्ड्यांबाबत वरिष्ठ पोलीस प्रशासन काय भूमिका घेते आणि प्रत्यक्ष कारवाई कधी होते, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे

बिंगो जुगाराच्या प्रकाराला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. संबंधित गावांमध्ये गोपनीय माहिती संकलित करून अचानक छापे टाकावेत आणि जुगार चालविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

जिल्हा बँकेत आ. प्राजक्त तनपुरे विजयी कार्यकर्त्यांचा फटाके फोडून जल्लोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी: अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत माजी मंत्री तथा अहिल्यानगर विधानपरिषदेचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी सोसायटी मतदारसंघातून भरघोस मतांनी विजय मिळविल्यानंतर राहुरी शहरात आमदार तनपुरे यांच्या समर्थकांसह त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात जल्लोष केला.



आमदार तनपुरे यांच्या संपर्क कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाक्यांची जोरदार आतषबाजी केली आणि आमदार तनपुरे यांच्या विजयाचा आनंद साजरा केला.

जिल्हा बँकेच्या या निवडणुकीत आमदार प्राजक्त तनपुरे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजित कदम यांचा पराभव केला. आमदार तनपुरे यांना ८९ मते, तर सत्यजित कदम यांना अवघी १८ मते मिळाली. आमदार तनपुरे विजयी झाल्यानंतर विजयाचा जल्लोष साजरा करण्यासाठी सोहम तनपुरे, नगरसेवक बबन गुलदगड,उपसभापती रवींद्र आढाव, गणेश घाडगे,

बाळासाहेब खुळे, प्रदीपभुजाडी, काशिनाथ काकडे, राजेंद्र बोरकर, सागर डुक्रे, बाळासाहेब रासने, साई तनपुरे, प्रकाश शेलार, राम तोडमल सुनील बोरुडे आयुब शेख, आदींसह अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जल्लोष साजरा करण्याऱ्या ऐवजी आ. तनपुरे थेट आदिवासी वस्तीवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : काल दिनांक ३ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या मतमोजणीमध्ये अहिल्यानगर विधान परिषदेचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी समोरचे उमेदवार सत्यजित कदम यांना पराजित करीत भरघोस मतांनी विजयी झाले. परंतु दुष्काळी परिस्थिती पाहता विजयाचा जल्लोष साजरा करण्याऐवजी आ. प्राजक्त तनपुरे यांनी थेट आदिवासी वस्ती गाठून त्या ठिकाणी आदिवासींच्या अडीअडचणी जाणून घेत संबंधितअधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. आ.प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील वाबळेवाडी येथे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर काल प्रत्यक्ष गावाला भेट देऊन पाणीटंचाई संदर्भाच्या परिस्थितीची पाहणी केली. आणि प्रत्यक्ष गावातील ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना गावकऱ्यांच्या समस्यांची तातडीने दखल घेण्याच्या सूचना दिल्या मुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



नागवडे कारखान्याकडून शेतकरी, कामगारांना ११.३४ कोटींचे वाटप

ऊस विकास अनुदानापोटी ८.७२ कोटी । तर वेतन व बोनसपोटी २.६२ कोटी रुपये जमा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने सभासद शेतकरी आणि कामगारांना दिलेला शब्द पाळत एकूण ११ कोटी ३४ लाख रुपयांची रक्कम त्यांच्या बँक खात्यांत जमा केली आहे. यामध्ये ऊस विकास प्रोत्साहन अनुदानापोटी शेतकऱ्यांना ८ कोटी ७२ लाख रुपये, तर कामगारांचे वेतन आणि बोनसपोटी २ कोटी ६२ लाख रुपये देण्यात आले आहेत. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी दिली.

कारखान्याने सन २०२५-२६ च्या गळीत हंगामात ५ लाख ८१ हजार ६० टन उसाचे गाळप केले. ऊस उत्पादक सभासद आणि शेतकऱ्यांना प्रतिटन तीन हजार रुपये पहिला हप्ता देण्यात आला होता. त्यानंतर दिलेल्या आश्वासनानुसार प्रतिटन १५० रुपये ऊस विकास प्रोत्साहन अनुदानापोटी एकूण ८ कोटी ७२ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत. तसेच कामगारांचे वेतन आणि बोनसची २ कोटी ६२ लाख रुपयांची रक्कमही अदा करण्यात आली आहे.

दरम्यान, कारखान्याच्या सभासदांना गटवार सवलतीच्या दरात साखर वाटप सुरू असून, येत्या ७ तारखेपर्यंत हे वाटप सुरू राहणार आहे. सभासदांनी मुदतीत साखर घेऊन जावी, असे आवाहन नागवडे यांनी केले आहे.

सहकारी साखर कारखानदारी टिकविणे गरजेचे

स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या विचारांचा वारसा जपत कारखान्याचा कारभार सभासद आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन सुरू आहे. ऊसदराच्या बाबतीत नागवडे कारखाना कधीही मागे राहिलेला नाही आणि यापुढेही राहणार नाही, अशी ग्वाही राजेंद्रदादा नागवडे यांनी दिली.

चालू गळीत हंगाम जानेवारी २०२७ अखेरपर्यंत सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाई न करता आपला ऊस नागवडे कारखान्याला गळितासाठी द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सहकारी साखर कारखानदारीमुळे शेतकरी, कामगार आणि परिसरातील नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. मात्र, सध्या खासगी साखर कारखानदारीचे प्रमाण वाढत आहे. भविष्यात शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी सहकारी साखर कारखानदारी टिकविणे आवश्यक आहे. त्यासाठी ऊस उत्पादक सभासदांनी एकजुटीने सहकार्य करावे, असे आवाहनही नागवडे यांनी केले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आ.आशुतोष काळेंचा दणदणीत विजय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : आशिया खंडात सहकार क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या व अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागाची आर्थिक कामधेनु म्हणून ओळख असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत शेती पूरक मतदार संघातून सहकार विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार व सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन आ.आशुतोष काळे यांनी दणदणीत विजय मिळविला आहे.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत शेतीपूरक मतदार संघातून सहकार विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असलेले आमदार आशुतोष काळे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता.जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी यावेळी मोठ्या प्रमाणात अर्ज दाखल होवूनही अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी शेतीपूरक मतदार संघातून आमदार आशुतोष काळे यांची बिनविरोध निवड होता होता राहिल्यामुळे आमदार आशुतोष काळे निवडणुकीला सामोरे गेले.

निवडणुकीतील विजय जरी त्यांच्या दृष्टीपथात असला तरीपण त्यांनी गाफील न राहता सहकार विकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या सहकार्याबरोबरच स्वत:ची यंत्रणा उभी करून प्रत्येक मतदारांपर्यंत ते पोहोचले होते.त्यामुळे पुन्हा एकदा त्यांनी दणदणीत विजय मिळवत २०१७ ला पार पडलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीपासून ते २०१९ असेल किंवा २०२४ ची विधानसभा निवडणूक असेल त्या प्रत्येक निवडणुकीत यश मिळवत जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही आपली यशाची परंपरा आमदार आशुतोष काळे यांनी कायम ठेवली आहे.

राज्यातील सर्वात मोठी असलेली अहमदनगर जिल्हा बँक हि शेतकऱ्यांची बँक आहे.भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होणे गरजेचे होते. त्यामुळे पुढील दुष्काळी परिस्थितीवर नक्कीच अजून काही प्रभावी उपाययोजना निश्चितपणे करता आल्या असत्या. परंतु आपल्या देशात लोकशाही असल्यामुळे इतर ११ जागा बिनविरोध झाल्या मात्र १० जागांवर एकमत न झाल्यामुळे शेती पूरक मतदार संघाच्या जागेवर शेवटच्या क्षणी निवडणूक लादली गेली. शेतीपूरक मतदार संघात निवडणूक झाल्यास निकाल काय लागणार हे जरी मला माहित होते तरी लोकशाहीचा आदर ठेवून निवडणुकीला सामोरे गेलो.आणि सुज्ञ मतदारांनी त्याचे काम चोख बजावत दणदणीत विजय मिळवून दिला.त्याबद्दल सर्व मतदारांचे तसेच सहकार विकास आघाडीच्या सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे व माझ्या विजयात प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या सर्वांचे आभार.

-आ.आशुतोष काळे.